❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | सोमवार, दि. १७ ऑगस्ट २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २३२ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com | Epaper - www.sandhyaepaper.com | www.youtube.com/@sandhyalivenews




# दैनिक संध्या


नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

समुद्र मंथनाने कळली
जगास ज्यांची महती
अशा नागदेवांना सारे जग वंदती...
नागपंचमी
नागपंचमीच्या शुभेच्छा!

## संध्या प्रहार




# काँग्रेस वंदे मातरम विसरली : अमित शाह



■ जयपूर (दै. संध्या)

केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी काँग्रेसवर वंदे मातरमचा अपमान केल्याचा आरोप केला आहे. व्होट बँकेच्या लालसेपोटी काँग्रेस वंदे मातरम विसरली असल्याचे ते म्हणाले. ते म्हणाले की, वंदे मातरमच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून हे गाणे पुन्हा सादर केले. ते म्हणाले, काँग्रेस पक्षाची निर्लज्जता पाहा. काँग्रेस पक्षाच्या मुख्यालयात वंदे मातरम गायले जात होते. गाणे सुरू असताना काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी काँग्रेस अध्यक्षांना गाणे थांबवण्यास सांगितले. आम्ही सर्वांनी टीव्हीवर पाहिले. ८० वर्षांनंतर बंकिमबाबूंच्या या गाण्याला पुन्हा सन्मान मिळत आहे, पण सोनिया गांधी यामुळे खूश नाहीत.

रविवारी राजस्थान दौऱ्यादरम्यान चित्तोरगड जिल्ह्यातील निंबाहेरा येथे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या २१ फूट उंच अष्टधातू पुतळ्याचे अनावरण केल्यानंतर अमित शाह एका जाहीर सभेला संबोधित करत होते. ते म्हणाले की, देशातील १.४ अब्ज लोक सोनिया गांधींच्या कृतीकडे पाहत आहेत. देश 'वंदे मातरम'चा अपमान कधीही स्वीकारणार नाही. ते म्हणाले की, काँग्रेस पक्षात थोडी जरी लाज शिल्लक असेल, तर त्यांनी या कृत्याबद्दल बंकिम बाबूंच्या अमर आत्म्याची आणि देशातील जनतेची हात जोडून माफी मागावी.

राष्ट्रसुवर्ण महाराणा प्रताप यांना आदरांजली वाहताना केंद्रीय गृहमंत्री म्हणाले की, मेवाडची ही शूर भूमी देशभक्तांसाठी काशीपेक्षा कमी नाही. ते म्हणाले की, महाराणा प्रताप, वीर पूंजा भिल आणि सेठ भामाशाह यांच्या या शूर भूमीच्या देशभक्तीने, धर्मनिष्ठेने आणि स्वराज्याप्रती असलेल्या समर्पणाने मुघलांचा विजयरथ रोखला होता.

गृहमंत्री म्हणाले की, माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे संपूर्ण आयुष्य 'राष्ट्र प्रथम' या भावनेला समर्पित होते. त्यांनी लहानपणापासूनच देशभक्तीचा मार्ग अवलंबला. ४० वर्षे विरोधी पक्षात राहून आणि सर्व प्रतिकूल परिस्थितीचा सामना करूनही देशभक्तीचे तत्त्व त्यांच्या जीवनाचा पाया राहिले. पंतप्रधान म्हणून त्यांनी देशाच्या विकासासाठी अनेक मोठे निर्णय घेतले. जागतिक दबावाला न जुमानता त्यांनी पोखरणमध्ये अणुचाचणी केली.

> “ निंबाहेरा येथील जेके सर्कलमधील मिनी अटल स्मारकात स्थापित वाजपेयींचा पुतळा सुमारे ४,००० किलोग्रॅम अष्टधातूपासून बनलेला आहे. तो आठ फूट उंच चौथऱ्यावर बसवण्यात आला आहे. हा पुतळा जयपूरच्या कारागिरांनी घडवला आहे. या स्मारकात आणखी दोन चौथरे आहेत: एकावर वाजपेयींच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात झालेल्या पोखरण अणुचाचण्या दर्शवल्या आहेत, तर दुसऱ्यावर ते विविध मुद्रांमध्ये भाषणे देताना दाखवले आहेत.

# हायकोर्ट परीक्षेतील गोंधळावरून अभिजीत दिपकेंचा संताप, आंदोलनात सहभागी


■ छत्रपती संभाजीनगर (दै. संध्या)



छत्रपती संभाजीनगर शहरातील सेव्हन हिल परिसरातील सुराणा नगर येथील परीक्षा केंद्रावर या परीक्षेदरम्यान मोठा गोंधळ उडाल्याचे समोर आले आहे. परीक्षा सुरू होताच अचानक सर्व्हर डाऊन झाल्याचा आरोप विद्यार्थ्यांकडून करण्यात आला असून, यामुळे शेकडो परीक्षार्थींची परीक्षा खोळंबली. विशेषतः दूरवरून आलेल्या उमेदवारांना या अचानक उद्भवलेल्या तांत्रिक अडचणीचा मोठा फटका बसल्याने परीक्षा केंद्रावर संतापाचे वातावरण निर्माण झाले असून आता कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके देखील विद्यार्थ्यांच्या आंदोलनात सहभागी झाले आहेत. जोपर्यंत विद्यार्थ्यांच्या मागण्या पूर्ण होत नाही, तोपर्यंत आम्ही इथून जाणार नाही, अशी भूमिका दिपके यांनी घेतली आहे. अभिजीत दिपके म्हणाले, आज इथे हायकोर्टाची परीक्षा होती. इथे खूप लांबून विद्यार्थी आले होते. ते जेव्हा परीक्षेला बसले तेव्हा त्यांना समजले की इथले कम्प्युटर काम करत नाही तर कोणाची स्क्रीन काम करत नाहीये. विशेष म्हणजे 10 मिनिटांच्या आत लॉग आऊट होत होते. याचा अर्थ सर्व्हरही चांगले काम करत नव्हते. आणि सगळ्याच विद्यार्थ्यांना फेल करण्यात आले आहे. तर हे विद्यार्थी फेल नाही झाले, ही सिस्टम फेल झाली आहे, सरकार फेल झाले आहे. पुढे बोलताना अभिजीत दिपके म्हणाले, या सेंटरवरचे जे आहेत तेच विद्यार्थ्यांना सांगत होते की तुम्हाला कळत नाही का परीक्षा कशी द्यायची. हे विद्यार्थी इतके लांबून आले आहेत. त्यांना आकला नव्हत्या का चांगले पीसी लावायचे, चांगले किबोर्ड लावायचे, सर्व्हर नीट करायचे, स्वतःला अक्कल नाही या सरकारला आणि विद्यार्थ्यांची अक्कल काढत आहेत.

> “ ऑनलाइन परीक्षा घ्यायची लायकी नाही तर विद्यार्थ्यांचे भविष्य का खराब करत आहेत? असा संतप्त सवाल अभिजीत दिपके यांनी उपस्थित केला. तसेच ते म्हणाले, एक परीक्षा दाखवा जिथे व्यवस्थित ऑनलाइन परीक्षा घेतली गेली आहे. जिथे सर्व्हर चांगले असतील, कम्प्युटर चांगले असतील, अशी एक परीक्षा दाखवा. लायकी नाही तुमची तर विद्यार्थ्यांचे भविष्य खराब नका करू. जोपर्यंत या मुलांच्या मागण्या पूर्ण होत नाही, तोपर्यंत मी स्वतः इथून हलणार नाही आणि मी या विद्यार्थ्यांसोबत इथेच बसून राहणार आहे, असे दिपके म्हणाले.

## थोडक्यात...



### मुंडे काँग्रेसमध्ये असते, तर प्राण वाचले असते

मुंबई : दैनिक संध्या

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत सत्ताधाऱ्यांवर सडकून टीका केली. राहुल गांधींना आलेली नोटीस, स्वातंत्र्यदिनाचे भाषण, 'वंदे मातरम'चा मुद्दा आणि गोपीनाथ मुंडे यांच्या भाजपमधील प्रवासावर राऊतांनी खळबळजनक विधाने केली आहेत. राज्यात आणि देशात शोधून शोधून 'इडियट्स' गोळा करून सरकार चालवले जात असल्याचा घणाघात त्यांनी केला. सातारा येथील मंत्र्याबाबत (जयकुमार गोरे) बोलल्यामुळे आपल्याला नोटीस आल्याचे सांगत राऊत म्हणाले, "जर 'इडियट' हा शब्द असंसदीय असेल, तर सेन्सॉर बोर्डाने त्यावर बंदी आणली पाहिजे. भाजपच्या लोकांना इडियट का म्हटले जाते, हे लोक रोज पाहतात. देशात आणि महाराष्ट्रात शोधून शोधून इडियट लोक एकत्र आणले आहेत आणि त्यांना कॅबिनेट व राज्यमंत्री केले आहे. हे सगळे 'इडियट कॅबिनेट' आहे, घ्या आता माझ्यावर तक्रार करा," असे खुले आव्हान राऊत यांनी दिले.

### १,४४० डॉक्टरांची लवकरच नियुक्ती

मुंबई : दैनिक संध्या

राज्यात उपलब्ध झालेल्या १,४४० डॉक्टरांची येत्या काही दिवसांत नियुक्ती करण्यात येणार आहे. आणखी ६०० डॉक्टरांसाठी जाहिरात काढण्यात येत असून, सुमारे २५० दंतचिकित्सकही लवकरच आरोग्य सेवेसाठी उपलब्ध होतील, अशी माहिती आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. आरोग्य व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, असेही त्यांनी सांगितले. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या महिला आरोग्य समिती, जन आरोग्य समिती आणि रुग्णकल्याण समितीच्या सदस्यांशी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी ऑनलाइन पद्धतीने ‘जन आरोग्य संवाद’ साधला. आरोग्य समित्यांच्या माध्यमातून आतापर्यंत सहा लाखांहून अधिक नागरिकांशी संवाद साधण्यात आला आहे. भविष्यात आणखी चार लाख नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या आरोग्यविषयक समस्या जाणून घेत त्या सोडविण्यात येणार असल्याचे आरोग्यमंत्री श्री. आबिटकर यांनी सांगितले. या संवादात आरोग्य समित्यांच्या बैठका नियमित होतात का, डॉक्टर वेळेवर उपस्थित राहतात का, डॉक्टरांचा रुग्णांशी योग्य संवाद होतो का आणि रुग्णालयांमध्ये आवश्यक सेवा उपलब्ध आहेत का, याची थेट माहिती घेण्यात आली. स्थानिक पातळीवरील अडचणी समजून घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना करण्यावर भर दिला जाणार आहे. आरोग्य व्यवस्था कागदावर नव्हे, तर प्रत्यक्ष रुग्णालयात आणि नागरिकांच्या अनुभवातून दिसली पाहिजे, असे आरोग्यमंत्री श्री. आबिटकर यांनी स्पष्ट केले. आरोग्य सेवांशी संबंधित तक्रारी आणि समस्या नागरिकांना थेट प्रशासनापर्यंत पोहोचविता याव्यात, यासाठी लवकरच ऑनलाइन पोर्टल कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्याद्वारे नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारली जाईल. स्थानिक बचत गटांच्या माध्यमातून रुग्णांना दर्जेदार, सकस आणि पोषक आहार उपलब्ध करून देण्याची व्यवस्थाही निर्माण करण्यात येणार, असेही त्यांनी सांगितले.

# “रिक्षा चालवणार, पैसेही कमावणार, पण मराठी बोलणार नाही!”

## रिक्षाचालकांच्या मराठी सक्तीवरून मंत्री प्रताप सरनाईकांना थेट आव्हान

■ मुंबई (दै. संध्या)



राज्यात 15 ऑगस्ट 2026 पासून ऑटो-रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषा बोलण्याची सक्ती करण्यात आली आहे. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, ज्या उत्तर भारतीय किंवा इतर रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी येत नाही, त्यांचे परमिट थेट रद्द केले जाईल. शासनाच्या या नव्या नियमाचे एका बाजूला सर्वत्र स्वागत होत असले तरी, दुसऱ्या बाजूला यावरून मोठा राजकीय वाद पेटला असून काही घटकांकडून या निर्णयाला तीव्र विरोध केला जात आहे. या सक्तीला कडाडून विरोध दर्शवत उत्तर भारतीय विकास सेनेचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष पंडित संजय दुबे यांनी परिवहन मंत्र्यांना थेट आव्हान दिले आहे. त्यांनी एक व्हिडिओ शेअर करत सरकारच्या या निर्णयावर जोरदार टीका केली. या व्हिडिओच्या माध्यमातून प्रताप सरनाईक यांना खुले आव्हान देत ते अत्यंत बिनधास्तपणे म्हणाले आहेत की, "मी रिक्षा चालवणार, पैसेही कमावणार, पण मराठी कदापि बोलणार नाही." त्यांच्या या स्पष्ट आणि थेट आव्हानामुळे आता महाराष्ट्रात रिक्षाचालकांच्या परमिट आणि मराठी भाषेच्या सक्तीवरून सुरू असलेला हा वाद आणखीनच चिघळला आहे. सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर करत संजय दुबे म्हणाले, 15 ऑगस्ट 1947 रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले होते. मात्र आजच्या दिवशी राज्याचे परिवहन मंत्री आमच्यावर पुन्हा हा नियम लागून करुन गुलामी पत्करायला सांगत आहे. कोणताही तरुण ही गुलामगिरी आता सहन करणार नाही. तुम्ही मराठी भाषेच्या नावाखाली आम्हाला धमकवतात आहात? हा हिंदुस्तान आहे आणि आम्ही प्रेमाच्या भाषेचा नक्कीच आदर करू, पण सत्तेच्या जोरावर कोणतीही गोष्ट लादता येणार नाही. माझेही काही मराठी भाषा बोलणारे मित्र आहेत, मी त्यांचा नेहमीच आदर केला आहे, पण जर तुम्ही गुंडगिरी करणार असाल तर मात्र आम्ही खपवून घेणार नाही.

# ‘जीव गेला तरी चालेल, पण आंदोलनावर ठाम’

## मनोज जरांगे पाटलांचा सरकारला थेट इशारा; २९ ऑगस्टच्या आंदोलनाची रणनीती ठरली

■ जालना (दै. संध्या)



जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आंदोलनाची हाक दिली आहे. येत्या 29 ऑगस्ट रोजी होणाऱ्या या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर अंतरवाली सराटीत तज्ज्ञ आणि अभ्यासकांसोबत एका विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या महत्त्वाच्या बैठकीत सरकारसमोर यापूर्वी मांडण्यात आलेल्या मागण्या, त्याबाबतची कायदेशीर बाजू आणि सरकारने दिलेल्या एसओपी संदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. अभ्यासकांशी झालेल्या या चर्चेनंतर मनोज जरांगे पाटील यांनी आगामी आंदोलनाची पुढील दिशा निश्चित केली आहे. आपली आक्रमक भूमिका स्पष्ट करताना त्यांनी, '29 ऑगस्ट रोजी होणाऱ्या आंदोलनात जीव गेला तरी चालेल, परंतु आपण या आंदोलनावर पूर्णपणे ठाम आहोत,' असा ठाम निर्धार व्यक्त केला. यासोबतच, सरकारने मराठा आरक्षणासंदर्भात काढलेल्या जीआरमध्ये चुका असल्याचे मान्य करावे आणि त्यात तातडीने योग्य ती सुधारणा करावी, अशी महत्त्वपूर्ण मागणीही त्यांनी यावेळी केली आहे. पत्रकार परिषदेत बोलताना मनोज जरांगे म्हणाले, मी चर्चेत तीन प्रश्न घेतलेत. आतापर्यंत जे सरकारने जीआर काढले त्यात काही बदल करायचे आहेत का? शिवाय या पुढे जे जीआर काढणार आहेत ते कसे काढायचे आणि ओबीसी सवलतीवर चर्चा करण्यात आली. सरकारने हैदराबाद गॅझिटीयर आणि ओबीसी सवलतीचा जीआर काढले, त्यात काय बदल, सुधारणा करायच्या हा प्रश्न मी अभ्यासकांना विचारला. दरम्यान, अभ्यासकांना समाजाने नाव ठेऊ नये, मी वेळ दिला म्हणून आलोय. सरकारने आता पुढचे ठरवायचंय. मात्र समाजाला जे हवं आहे ते आम्ही मिळवून राहू, असे जरांगे यांनी म्हटले. अंतरवाली सराटी येथे झालेल्या अभ्यासकांच्या बैठकीत मराठा आरक्षणासंदर्भातील प्रशासकीय अडचणींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. कुणबी प्रमाणपत्रासाठी रक्ताचा, नात्याचा की कुळाचा आधार घ्यायचा, याबाबत सखोल गृहचौकशी व्हावी अशी प्रमुख मागणी यावेळी अभ्यासकांनी लावून धरली. याशिवाय, गावपातळीवर काम करणाऱ्या समितीला केवळ शिफारस न ठेवता त्यांना संविधानिक अधिकार देण्यात यावेत आणि त्यांनी केलेल्या शिफारशी ग्राह्य धरल्या जाव्यात, अशी ठाम भूमिकाही अभ्यासकांनी मांडली. यावर मनोज जरांगे पाटील यांनी सहमती दर्शवत, ग्रामस्तरीय समितीला संविधानिक अधिकार देण्यासाठी सरकारकडे अधिकृत मागणी करणार असल्याचे स्पष्ट केले. मराठवाड्यातील कुणबी नोंदींच्या मुद्यावर अभ्यासकांनी शिंदे समितीच्या कामकाजावर नाराजी व्यक्त करत या समितीने समाधानकारक काम केले नसल्याचा आरोप केला. मराठवाड्यातील सर्व मराठा समाज हा कुणबी आहे, हे राज्य सरकारने मान्य करावे आणि ज्यांच्या नोंदी अद्याप सापडलेल्या नाहीत, त्या शोधण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी करण्यात आली. सध्याच्या शासन निर्णयामुळे नोंदी नसलेल्यांना प्रमाणपत्र देणे शक्य नसल्याने, जात पडताळणी कायद्यात तसेच 2001 आणि 2012 च्या कायद्यांमध्ये आवश्यक सुधारणा करण्याची गरज व्यक्त करण्यात आली. तसेच, हैदराबाद गॅझेटियरमधील आकडेवारीचा आधार घेऊन सर्वांना कुणबी प्रमाणपत्र मिळावे, या मुद्द्यावर उपस्थित सर्वांचे एकमत झाल्याचे या बैठकीत पाहायला मिळाले.

# रस्ते दुरुस्तीसाठी प्री-कास्ट, पॉलिमर टेक्नो पॅचचा वापर – उपमुख्यमंत्री

## चाकण-तळेगाव औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांच्या अडचणी सोडविण्यासाठी सर्वोच्च प्राधान्य

■ मुंबई (दै. संध्या)



चाकण-तळेगाव औद्योगिक क्षेत्रामधील वाहतूक कोंडी रोखण्यासाठी रस्त्यावरील खड्डे बुजविण्याला प्रशासनाने प्राधान्य द्यावे, मात्र पावसाळ्यात रस्ता दुरुस्तीसाठी येणाऱ्या अडचणी लक्षात घेता प्री-कास्ट तसेच जिओ पॉलिमर टेक्नो पॅच यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिले. पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली १४ विभागांनी एकत्र येऊन तात्काळ कृती आराखड्याची अंमलबजावणी करावी, असे निर्देशही उपमुख्यमंत्र्यांनी दिले.

घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प, पोलीस ठाणे, अग्निशमन केंद्र आणि विद्युत उपकेंद्रांसाठी एमआयडीसीकडून जागा उपलब्ध करून देण्यासह चाकण शहराच्या विकास आराखड्याला तात्काळ मंजुरी देण्यात येईल, अशी घोषणाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. चाकण-तळेगाव औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांच्या विविध अडी-अडचणी जाणून घेण्यासाठी आयोजित बैठकीत उपमुख्यमंत्र्यांनी उपस्थितांशी दूरदृश्यप्रणालीद्वारे संवाद साधला. या बैठकीस उद्योगमंत्री उदय सामंत, खासदार डॉ. अमोल कोल्हे, विधान परिषद सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार बाबाजी काळे, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. अन्बलगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्रसिंह कुशवाह, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त अभिजित चौधरी यांच्यासह चाकण, तळेगाव औद्योगिक क्षेत्रातील उद्योजक आणि औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी, ऊर्जा, पोलीस, नगररचना, कामगार, पीएमआरडीए आदी विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्र हे देशाचे औद्योगिक इंजिन आहे आणि त्या इंजिनाची खरी ताकद चाकण आणि तळेगाव सारख्या औद्योगिक पट्ट्यात आहे, त्यामुळे येथील उद्योगांना भेडसावणारा वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी कमी, मध्यम आणि दीर्घकालीन उपाययोजना करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या. पावसाळ्यामध्ये रस्त्यांची दुरुस्ती करताना येणाऱ्या अडचणी लक्षात घेता आणि तातडीच्या उपाययोजना करण्यासाठी ठाणे-नाशिक मार्गावर किंवा कशेडीच्या बोगद्यात वापरलेल्या प्री-कास्ट रस्त्यांचा फॉर्म्युला तसेच जिओ पॉलिमर टेक्नो पॅच यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या सूचना यावेळी त्यांनी दिल्या. चाकण-तळेगाव परिसरातील उद्योगांच्या तसेच स्थानिक जनतेच्या अडचणींवर मार्ग काढण्यासाठी पुण्याचे जिल्हाधिकारी नोडल अधिकारी म्हणून काम पाहतील, सर्व १४ विभागांचे अधिकारी त्यांच्या समन्वयाने काम करतील, त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी दर शुक्रवारी सर्वांची बैठक घेऊन कामांना गती देण्याचे निर्देशही यावेळी दिले. चाकण औद्योगिक क्षेत्रात सुरू असलेल्या रस्त्यांच्या कामांचा प्रशासनाने आढावा घेऊन या कामांना गती द्यावी तसेच कामात टाळाटाळ करून दिरंगाई करणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई करण्याच्या सूचनाही यावेळी दिल्या. औद्योगिक क्षेत्रातील मलनिस्सारण, घनकचरा, पाणी, रस्ते, वीज आदी एकमेकांशी निगडित असलेल्या सुविधांचा सर्वसमावेशक आराखडा तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देशही यावेळी उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिले. चाकण शहरातील रस्त्यांच्या अवस्थेमुळे होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी रस्त्याच्या कडेला पडणारे खड्डे बुजविण्याला देखील प्राधान्य द्यावे, आवश्यक असेल तेथे नवीन अंतर्गत रस्ते, पर्यायी मार्ग आणि उड्डाणपूल उभारणीचेही नियोजन करण्याच्या सूचना यावेळी दिल्या.



# माजी उपसभापतींनी घेतला गळफास

■ मुंबई (दै. संध्या)

पश्चिम बंगाल विधानसभेचे माजी उपसभापती आशिष बॅनर्जी यांचा संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाला. रविवारी सकाळी बीरभूम जिल्ह्यातील टीएमसी कार्यालयात त्यांचा मृतदेह फासावर लटकलेल्या अवस्थेत आढळला. आशिष बॅनर्जी रामपूरहाटच्या प्रभाग क्रमांक-५ मधील हत्तलापारा परिसरात राहत होते. त्यांच्या घराशेजारीच तृणमूल काँग्रेसचे पक्ष कार्यालय होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १६ ऑगस्ट रोजी सकाळी कार्यालयातून एक सुसाइड नोटही मिळाली. आशिष बॅनर्जी टीएमसीचे माजी आमदारही होते. पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. आशिष बॅनर्जी हे ममता बॅनर्जींच्या जवळचे आणि तृणमूल काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांपैकी एक होते. पश्चिम बंगालमध्ये टीएमसीचे सरकार आल्यानंतर त्यांनी अनेक विभागांचे मंत्रीपद भूषवले. ते शालेय शिक्षण आणि कृषी मंत्रीही राहिले होते. आशिष बॅनर्जी हे 2001, 2006, 2011, 2016 आणि 2021 मध्ये रामपूरहाट मतदारसंघातून सलग पाच वेळा आमदार म्हणून निवडून आले होते. मागील ममता सरकारमध्ये ते विधानसभेचे उपसभापतीही होते.

## संपादकीय

# अनोळखी, अस्पर्शित निसर्ग आणि गूढ संस्कृतीचा शोध...

फ्रेंच चित्रकार पॉल गोगँ १८९१ साली ताहितीला गेला. पॅरिसच्या झगमगाटी, कृत्रिम, व्यावसायिक वातावरणाला कंटाळून, गोड गुलाबी, एंजेलिक चेहऱ्यांच्या तरुणींची दिवाणखान्याला शोभेलशी पेंटिंग्ज करणाऱ्या आणि ती मोठ्या संख्येने विकत घेणाऱ्यांच्या जगात राहण्याचा त्याला उबग आला होता. त्याला आत्मिक समाधानाची आस लागली होती. अनोख्या, लखलखीत सूर्यप्रकाशात सदैव न्हाऊन निघालेल्या पोलिनेशियन बेटांवर त्याला ते गवसले. तिथे तो पुढची तब्बल बारा वर्षे राहिला. त्वचेवर झळझळती सुवर्णआभा ल्यायलेल्या, निरागस माओरी तरुणींची त्याने शेकडो चित्रे चितारली. त्यापैकी अगदी सुरुवातीचे देखणे, पोस्ट इम्प्रेशनिस्ट शैलीतले हे चित्र 'ताहितीयन विमेन ऑन द बीच'. झळाळत्या ताम्रकांतीच्या दोन माओरी तरुणींच्या चेहऱ्यावर आदिवासी मुक्त जगण्याचा निर्भर सहज आनंद निथळत आहे, त्यांची बसण्याची सहज, तरीही शैलीदार ढब, खास पोलिनेशियन चेहरेपट्टी, काहीशी भौमितिक शरीररेखा आणि खास गोगँ धाटणीचे उत्कट ठसठशीत रंगलेपन, कोणतेही अतिरिक्त तपशील किंवा कलाकुसर नसलेलं, अमृता शेरगिलसारख्या आधुनिक भारतीय चित्रकर्तीच्या चित्रशैलीवर मोठा प्रभाव असलेलं हे चित्र. त्याच्या मनातले या अनोळखी, गूढ संस्कृतीचे अनिवार आकर्षण चित्रात उमटले.

ताहिती निसर्गाने गोगँमधल्या चित्रकाराला भुरळ पाडली होती, त्याचवेळी त्याच्यातल्या संवेदनशील माणुसकीने, बुद्धिवादी विचारसरणीने त्याला अंतर्मुखही केले. इथल्या वास्तव्यात गोगँच्या कलेत सखोलता आली. मुक्त, निसर्गाच्या सहवासात, भाबड्या, दैववादी आदिवासींच्या सहवासात त्याची एकेकाळची वास्तववादी, आधुनिक चित्रशैली बदलून गेली. त्यात गूढ प्रतीकात्मकता आली.

निसर्ग आणि मानव यांच्यातला दैवी, आध्यात्मिक बंध त्याला जाणवला होता. प्राचीन पोलिनेशियन संस्कृतीच्या अस्तित्वखुणा, माओरी आदिवासींच्या चालीरिती, देवदेवता, अंधश्रद्धा इतकेच नव्हे तर कालांतराने इथल्या अस्पर्शित निसर्गावर, निरागस जगण्यावर उमटत गेलेल्या आधुनिक युरोपियन संस्कृतीच्या प्रदूषण खुणा त्याच्या चित्रांमध्ये उमटत गेल्या. बाह्यत: बेदरकार, उद्धट, स्पष्टवक्ता, स्वैर जगणारा गोगँ मनाने हळवा, संवेदनशील होता. ताहितीला आल्यावर सुरुवातीच्या काळात त्याचा भ्रमनिरास झाला होता. इथे आपल्याला स्वर्ग सापडेल अशी त्याच्यातल्या चित्रकाराला भाबडी अपेक्षा होती. प्रत्यक्ष वास्तव्यात त्याला स्वर्गीय निसर्गसौंदर्याच्या जोडीला प्रदूषित सामाजिक जीवनही अनुभवायला मिळाले. त्यामुळे तो व्यथित झाला. त्याच्या पेंटिंग्जमध्ये या दोन्ही अनुभवांची आणि दृष्टिकोनांची झलक दिसते. पोलिनेशियन वास्तव्यावर आधारित 'नोआ नोआ' हे प्रवासवर्णनही त्याने लिहिले. पुढच्या काळात त्याच्या चित्रात वास्तवता कमी



आणि कल्पनारम्यता जास्त आहे अशी टीकाही झाली. मात्र, तरीही त्याच्या ताहिती चित्रांचं देखणं सौंदर्य आणि माओरी संस्कृतीच्या निसर्गानुगामी जीवनशैलीच्या दस्तावेजीकरणाचे मोल जराही उणावत नाही.

## संस्कृत सुभाषित

विद्वत्वं दक्षता शीलं संस्कारान्तिरनुशीलम् ।
शिक्षकस्य गुणा: सप्त सचेत्सत्वंप्रसन्नता ।

अर्थ : विद्वत्ता, दक्षता, चारित्र्य शील, संस्कार, करण्याची क्षमता, दयाळूपणा, चैतन्य आणि प्रसन्नता असे ते सात गुण आहे. आदर्श शिक्षकाच्या ठिकाणी आवश्यक असणारे गुण.

## उपदेशकथा

### चित्रकाराचा सन्मान

भोजराजाच्या आश्रयाला अनेक नाट्य कलाकार, संगीततज्ज्ञ, शिल्पकार, चित्रकार येत असतात. तो त्यांचा यथोचित आदर करी नि भरपूर धन देऊन सन्मानाने परत पाठवी. चित्रकार शिवशर्मा एकदा शेषनागाने एक अप्रतिम चित्र तयार केले. नंतर स्वत: ते चित्र राजदरबारात आणून राजाला भेट म्हणून त्याने अर्पण केले. 'वा! फारच छान आहे चित्र आहे हे आपले.' राजा कौतुकाने म्हणाला व आपल्या पद्धतीप्रमाणे दहा हजार मोहोरांची देणगीही जाहीर केली. पण शिवशर्मा केवळ चित्रकारच नव्हता. तो उत्तम कवीसुद्धा होता. चटकन तो बोलून गेला, 'महाराज, बेडकांना भक्षण करणारे नाग जागोजागी दिसतात. पण पृथ्वीचा भार सोसणारा एक शेषनागच बरं.' शेषनागाच्या उदाहरणातून सर्वांना आश्रय देणाऱ्या भोजराजाची त्याने केलेली ती स्तुती आणि त्याचबरोबर गोरगरीबांना पिळणाऱ्यांची केलेली निंदा चतुर राजाच्या लक्षात आल्यावाचून कशी राहील? संतुष्ट होऊन आणखी पंचवीस हजार मोहोरा त्याने शिवशर्माला दिल्या. राजदरबारातल्या इतर काही चित्रकारांना ही गोष्ट अर्थातच रुचली नाही. त्यांना त्यांच्या चित्रांबद्दल एवढे मोठे बक्षीस कदापि मिळाले नव्हते. राजाला त्यांच्या चेहऱ्याची नाराजी चटकन समजली व तो म्हणाला, 'मित्रांनो, चित्रकला नि काव्यकला यांचा अजोड संगम झालाय शिवशर्मात. दुग्धशर्करायोग. मणिकांचन योग म्हणतात तो यालाच बरे!' इतर चित्रकारांनीही मग शिवशर्माचा मोठेपणा मान्य केला आणि भोजनाच्या दरबारात आणखी एक नवरत्नाची भर पडली.

कथा उपदेश : अंगात गुण असले की कधी कधी तरी त्याचे चीज होते.

## पंचांग



| | |
|---|---|
| पंचांग | करण:बालव १७:००:२० |
| १७ ऑगस्ट २०२६ | करण:कौलव |
| सोमवार | २९:२०:२६+ |
| विक्रम संवत्– २०८२ | सूर्य:सिंह ०७:५४:३१ |
| श्रावण शके | चन्द्र:तुला१६:१९:०६ |
| संवत्– १९४८ | हिजरी सन् – १४४८ |
| संवत्सर –पराभवनाम | मुस्लिम मास – रबिलावल |
| अयन– दक्षिणयन | तारीख – ३ |
| मास– श्रावण | विशेष |
| ऋतु– सौर वर्षा | सूर्याचा मघा नक्षत्रप्रवेश |
| शुक्ल पक्ष | वाहन : मोर |
| तिथि:पंचमी १७:००:२० | श्रावणी सोमवार शिवपूजन |
| नक्षत्र:चित्रा २८:५८:२४+ | शिवामूठ : तांदूळ |
| योग:शुभ २७:२८:३४+ | नागपंचमी |

## आगामी साप्ताहिकी

१७ ऑगस्ट २०२६ सोमवार
सूर्याचा मघा नक्षत्रप्रवेश वाहन : मोर
श्रावणी सोमवार शिवपूजन
शिवामूठ : तांदूळ
नापंचमी
१८ ऑगस्ट २०२६ मंगळवार
सुपोदनवर्ण षष्ठी
मंगळगौरी पूजन
श्रियाळ षष्ठी कल्की जयंती
श्रीमंग थोरले बाजीराव पेशवे जयंती (तारेखप्रमाणे)
१९ ऑगस्ट २०२६ बुधवार
सीतला सप्तमी
बुधपूजन
गोस्वामी तुलसीदास जयंती
२० ऑगस्ट २०२६ गुरुवार
दुर्गाष्टमी
दर्वाष्टमी
बृहस्पती पूजन
खोरदाद साल
२१ ऑगस्ट २०२६ शुक्रवार
जरा – जिवंतिका पूजन

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०४२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 9 | | | | 8 | | | 3 |
| | 3 | | | 2 | | 7 | 9 | |
| 7 | 8 | | | | | | 1 | 6 |
| 6 | 7 | | | 4 | | | | |
| | 4 | 9 | 5 | | 1 | 6 | 3 | |
| | | | | 8 | | | 4 | 7 |
| 3 | 5 | | | | | | 6 | 9 |
| | 2 | 8 | | 9 | | | 7 | |
| 9 | | | 4 | | | | 8 | 5 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोड्याचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. १०४१ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 1 | 3 | 8 | 7 | 4 | 5 | 9 | 6 |
| 4 | 9 | 6 | 2 | 3 | 5 | 8 | 7 | 1 |
| 7 | 5 | 8 | 6 | 1 | 9 | 4 | 3 | 2 |
| 9 | 8 | 1 | 7 | 5 | 2 | 6 | 4 | 3 |
| 3 | 2 | 7 | 4 | 8 | 6 | 1 | 5 | 9 |
| 5 | 6 | 4 | 1 | 9 | 3 | 2 | 8 | 7 |
| 8 | 3 | 9 | 5 | 2 | 1 | 7 | 6 | 4 |
| 1 | 4 | 5 | 9 | 6 | 7 | 3 | 2 | 8 |
| 6 | 7 | 2 | 3 | 4 | 8 | 9 | 1 | 5 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९१४ – पहिले महायुद्ध–स्टालुपॉनेनची लढाई – जर्मनीचा रशियन सैन्यावर विजय.
- १९४३ – दुसरे महायुद्ध – जर्मनीने अमेरिकेची ६० लढाउ विमाने.
- १९४५ – इंडोनेशियाला नेदरलँड पासून स्वातंत्र्य.
- १९६० – गॅबनला फ्रांस पासून स्वातंत्र्य.

### राष्ट्रीय

- १६६६ – शिवाजी महाराजांनी बादशाह औरंगजेबाच्या तावडीतून आग्र्याहून मोठ्या हुशारीने पलायन केले.
- १९०९ – देशभक्त मदनलाल धिंग्रा यांना इंग्लंडमध्ये फाशी देण्यात आली.
- १९३४ – मुंबई कौन्सिलमध्ये देवदासी विधेयक मंजूर.

### जन्म

- १६२९ – जॉन तिसरा, पोलंडचा राजा.
- १८४४ – मेनेलेक दुसरा, इथियोपियाचा सम्राट.
- १८७८ – रेजी डफ, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.
- १८८७ – चार्ल्स पहिला, ऑस्ट्रियाचा सम्राट.
- १९१३ – डब्ल्यु. मार्क फेल्ट, एफ.बी. आय.चा निदेशक व वॉटरगेट कुभांडातील पत्रकारांचा खबऱ्या.
- १९२६ – ज्यॉंग झमिन, चीनचा राष्ट्राध्यक्ष.
- १९३२ – व्ही.एस. नायपॉल, इंग्लिश लेखक.

### निधन

- १३०४ – फुकाकुसा, जपानी सम्राट.
- १७८६ – फ्रेडरिक दुसरा, प्रशियाचा राजा.
- १९२४ – टॉम केन्डॉल, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.
- १९५८ – सर जॉन ह्यूबर्ट, मोहेंजोदडो व तक्षशिला ही स्थळे शोधून काढणारे.
- १९८८ – मोहम्मद झिया उल–हक, पाकिस्तानचा राष्ट्राध्यक्ष.

## : SMS :

Tum late kyu aaye?
Employee: Sir traffic me phas gaya tha
Boss: Kal jaldi nikalna
Employee: Sir aaj bhi traffic me hi fas jaunga.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३० | २३.३ |
| अहमदनगर | २८.९ | २२.६ |
| अकोला | ३२.२ | २५.५ |
| अमरावती | ३१.९ | २५.२ |
| बीड | ३४.९ | २७.२ |
| भंडारा | ३३.३ | २६ |
| बुलढाणा | ३८.७ | ३१.३ |
| चंद्रपूर | ३५.५ | २७.२ |
| चेन्नई | ४१.४ | २७.३ |
| नवी दिल्ली | ४२.३ | ३४.२ |
| धुळे | ३२.९ | २५.६ |
| गोंदिया | ३०.७ | २५.८ |
| जळगाव | ३१.९ | २४.९ |
| कोल्हापूर | २६.९ | २३ |
| लातूर | ३०.८ | २३.३ |
| मुंबई | ३३ | २९.८ |
| नागपूर | ३४.१ | २६.३ |
| नांदेड | ३३.५ | २४.८ |
| नंदूरबार | २७ | २४.४ |
| नाशिक | २७ | २३.५ |
| पुणे | २४.५ | २२.२ |
| पंढरपूर | ३३.८ | २३.७ |
| सातारा | २६.६ | २२.९ |
| सांगली | २९.९ | २३.५ |
| सोलापूर | ३३.९ | २४.१ |
| वर्धा | ३५.२ | २६.६ |

## आजचे राशिभविष्य



**मेष :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा:पूर्व बौद्धिक चळवळीचे नेतृत्व आपण कराल. त्यातून आपली प्रतिमा उंचावेल.

**वृषभ :** शुभ रंग : पांढरा, शुभ दिशा : पश्चिम जुन्या आठवणी, नव्या मित्रांची संगत यातून भरीव कामगिरी करू शकाल.

**मिथुन :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व घरात कुटुंबियांच्या तब्येती व काही विचित्र प्रश्न यातून सफाईने मार्ग काढावा लागेल.

**कर्क :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:उत्तर आयुष्याला वळण देणारे ठरावेत असे प्रस्ताव आपले उत्पन्नही वाढविणारे ठरतील.

**सिंह :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व कोणत्याही वादविवादात मध्यस्थी करू नका. शब्दप्रयोग व पैसा यांचा वापर विचारपूर्वक करा.

**कन्या :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा : उत्तर घरात काही मंगलकार्ये ठरतील. कार्यक्रमानिमित्त घरात पाहुण्यांची वर्दळ राहील.

**तुळ :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:पूर्व मैत्रिणीसह होणाऱ्या गप्पातून ज्ञानात भर पडेल. काही वैचारिक चर्चा हितकारक ठरतील.

**वृश्चिक :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पश्चिम घरातले मंगल वातावरण, नशीबाची अनुकूल साथ हे सर्व कसे चांगले जमून येणार आहे.


**धनु :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा : पूर्व अनाठायी खर्च टाळा. खर्च करताना आपण काही अनिष्ट गोष्टींना खतपाणी घालत नाही ना याची काळजी घ्या.

**मकर :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : पूर्व घरगुती आजारपण, नाराज शेजारी, पाहुण्यांचे मुक्काम आणि स्वत:ची कामाची घाई यातून वेळ काढावा लागेल.

**कुंभ :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : उत्तर प्रवासातून चांगले अनुभव आपल्या व्यवसायात बदल करायला लावतील. संततीशी वादाचे प्रसंग येतील.

**मीन :** शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा : उत्तर नोकरीच्या अपेक्षा असणाऱ्यांना अपेक्षित अशी नोकरी मिळेल. बदल लाभदायक ठरतील.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०४२



### आडवे शब्द

१. तिन्ही त्रिकाळ!
८. गोड
१०. नम्रतेने झुकलेला
११. रात्रीचा पाऊस
१२. स्थूल, भरपूर
१४. जोरदार बुक्का
१६. सुगंध पसरणे
१८. ठराविक ठसा
१९. युद्ध, लढाई
२१. उत्सव
२२. मारुतीचा वार
२५. खरकट्याचा ढीग
२७. एक तारवाद्य
३०. छोटी गाय
३२. अंतरिक्ष प्रवासी
३४. अधिक श्रेष्ठ, वरचढ
३६. संगीतातील ठेका
३७. नामघोष
३८. हात
३९. केस
४१. टक, दृष्टी
४३. विझवणे
४४. शिकारीचा प्राणी
४६. आईवडील
४७. रमापती
४८. उगीच
५१. च्या समक्ष, च्या देखत
५२. कापडाचा एक प्रकार
५३. ढाक्याचे प्रसिद्ध कापड
५५. धागे विणून कापड तयार करण्याचे साधन
५७. विकार
५८. सरसकट
६०. गाय
६१. भार
६३. सोन्याचा कस
६४. महाभारतातील खादाड राक्षस
६६. समुद्र
६७. कोल्हापूरची महालक्ष्मी
६९. केर
७१. जाडसर पीठ
७३. श्वासोच्छश्वास
७५. मध, ७६. पुष्पदल
७७. दर्पण
७८. मेंढपाळ

### उभे शब्द

१. कायदेशीर
२. करंजीच्या कडा कापणारी
३. मर्यादा, सीमा
४. निमग्न, गुंग
५. संभाषणाने हा साधला जाईलच असे नाही!
६. तोंडी लावण्याचा पदार्थ
७. वेडावाकडा वाढणारा एक औषधी कंद
८. निर्बुद्ध
९. अतिरेक करून सांगणे (वाक्य प्रचार)
१२. गणपतीचे एक नाव
१३. अर्धांगवायू
१५. बैलाच्या गळ्यातील दोर
१७. सैन्याचा दाणागोटा
२०. जुगाराचा एक प्रकार
२३. फक्त, केवळ
२४. खोडण्याचे साधन
२६. मकर
२७. सूट
२८. अशक्त
२९. शहानिशा
३१. वेलींची बाग
३२. काजळ, सुरमा इ.
३३. शूर मुलाची आई
३४. जप्ती
३५. आवेशाने पुढे जाणे
३८. अगदी क्षुल्लक
४०. त्वरित
४२. उपवासाचा कंद
४५. नवरदेव
४८. त्वरित समर्पक उत्तर देणारा
४९. अनुत्तीर्ण
५०. बडबड, त्रास
५१. सारखा
५२. पतंगाचा धागा
५३. थडगे, कबर
५४. खोटा, तात्पुरता
५६. गाजावाजा
५७. नादिरा नायिका असलेला दिलीप कुमारचा चित्रपट
५९. एकदम, पटकन
६२. सोन्याचा धागा
६५. चंद्र
६६. वाहन हाकणारा
६८. परमेश्वर
७०. पालव
७२. छिद्र
७४. शुभ्र प्राणी
७५. नंतर

### जम्बो शब्दकोडे क्र. १०४१ चे उत्तर

आडवे उत्तर १.पळपुटा ३.मधमाशी ६.खापर ९.समा १२.तपासनीस १४.लता १५.तनमनधन १७.रवानगी १९.कानन २०.डरकाळी २२.नर २३.भारत २५.बाबा २७.नाहक २९.ओळ ३०.तापदायक ३२.सदरा ३३.आळ ३५.कीर ३६.सरकारी ३९.यमक ४१.रखवालदार ४३.आरमार ४४.दणकट ४५.वट ४६.तवा ४७.खाजरा ४८.पारायण ५०.सामना ५२.राजद ५४.जनकजननी ५९.विमानतळ ६१.ऑफिस ६२.दमट ६४.हिमनग ६५.मडगार्ड ६७.गर्व ६८.मल ६९.रसातल ७१.जरतर ७३.मकर ७४.अपार ७५.मार्जार ७६.रुबाबदार ७७.दीर्घ ७८.लसलस ७९.घण ८०.कर

उभे उत्तर : १.पर्जन्यकाळ २.पुरातन ४.धडाधड ५.शीत ६.खास ७.पनीर ८.रसवान ९.सलगी १०.माता ११.कमतरता १३.पाकळी १६.नर १८.नरनारायण २१.काकटसर २४.तपकीर २६.बासरी २८.कटकट २९.ओळख ३१.दार ३३.आरसपान ३४.कालवण ३७.रमा ३८.कारखाना ४०.मकरंद ४२.दाट ४३.आवा ४४.दरारा ४६.तडक ४९.यजमान ५०.सान ५१.मनीऑर्डर ५३.जलद ५४.जत ५५.नळ ५६.जरड ५७.रासगरबा ५८.फट ५९.विमल ६०.नगरपाल ६३.मधुकर ६४.हिमनदी ६५.मलमास ६६.गाजर ७०.सारस ७२.तरुण ७३.मदार ७७.बक

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



### कृत्रिम बुद्धिमत्ता केंद्रांसाठी अत्याधुनिक शीतकरण यंत्रणांचे उत्पादन सुरू

**पुणे : दैनिक संध्या**

सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्सने पुण्यात फ्लॅक्टग्रुपच्या नव्या उत्पादन केंद्राचे काम पूर्ण केले असून, या केंद्रातून कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित माहिती केंद्रांसाठी अत्याधुनिक शीतकरण यंत्रणांची निर्मिती केली जाणार आहे. या नव्या उत्पादन केंद्रामुळे भारतासह आशिया-पॅसिफिक क्षेत्रातील वाढत्या शीतकरण आणि वातानुकूलन यंत्रणा बाजारपेठेत सॅमसंगची स्थिती अधिक मजबूत होणार आहे. सॅमसंगने नोव्हेंबर २०२५ मध्ये जागतिक वातानुकूलन क्षेत्रातील तज्ज्ञ असलेल्या फ्लॅक्टग्रुप या कंपनीचे अधिग्रहण पूर्ण केले होते. त्यानंतर सुरू झालेले पुण्यातील हे पहिले नवीन उत्पादन केंद्र आहे. सॅमसंग आणि फ्लॅक्टग्रुपच्या एकत्रित व्यवसाय विस्ताराच्या दृष्टीने या केंद्राला महत्त्वाचे स्थान आहे. मुंबई तसेच प्रमुख वाहतूक आणि मालवाहतूक सुविधांच्या जवळ पुण्यात हे उत्पादन केंद्र उभारण्यात आले आहे. त्यामुळे देशातील ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासोबतच आशिया-पॅसिफिक क्षेत्रातील विविध देशांमध्ये शीतकरण आणि वातानुकूलन यंत्रणांचा जलद पुरवठा करणे शक्य होणार आहे.

### 'दोस्त' उपक्रमातून महाराष्ट्रातील तरुणांच्या कौशल्यांना करिअरची नवी दिशा

**पुणे : दैनिक संध्या**

योग्य कौशल्ये, आत्मविश्वास आणि प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळाल्यास तरुणांना आपल्या आवडीच्या क्षेत्रात चांगल्या संधी निर्माण करता येतात. सॅमसंग इंडियाच्या 'दोस्त' या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमातून महाराष्ट्रातील अनेक तरुणांना किरकोळ विक्री क्षेत्रातील आवश्यक कौशल्यांचे प्रशिक्षण देऊन त्यांच्या करिअरला नवी दिशा देण्यात येत आहे. महाराष्ट्रातील सात तरुणांचा देशभरातील 'सॅमसंग दोस्त विक्री' उपक्रमातील ९ हजार ४०० हून अधिक प्रशिक्षणार्थींमधून निवड झालेल्या ३० उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रशिक्षणार्थींमध्ये समावेश झाला आहे. त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत गुरुग्राम येथील सॅमसंग इंडियाच्या प्रादेशिक मुख्यालयात नुकताच त्यांचा सत्कार करण्यात आला.



### विधिसंघर्षग्रस्त बालकांना 'संवाद परिवर्तन यात्रा'तून नव्या दिशेची प्रेरणा

**पुणे : दैनिक संध्या**

प्रमाणपत्र मिळाल्यानंतर मुलांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद आणि आत्मविश्वास हा या यात्रेतील भावनिक क्षण ठरला. कालपर्यंत चुकीच्या गोष्टींचे 'रिल्स' फॉरवर्ड करणाऱ्या काही मुलांच्या हातात आज पोलिसांनी दिलेले प्रमाणपत्र होते आणि तेच प्रमाणपत्र ते अभिमानाने इतरांपर्यंत पोहोचवत होते. एका दिवसात आयुष्य बदलत नसले तरी आयुष्य बदलण्याची दिशा नक्कीच बदलू शकते... ही दिशा मुलांना मिळाली संवाद परिवर्तन यात्रेतून. विधिसंघर्षग्रस्त बालकांनी चुकीच्या मार्गाला लागू नये, त्यांच्या आयुष्याला सकारात्मक दिशा मिळावी, त्यांच्या मनातील क्षमता, स्वप्ने आणि आत्मविश्वास जागृत व्हावा, या उद्देशाने पुणे पोलीस आणि धनकवडी येथील आदर्श मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'संवाद परिवर्तन यात्रा – मूव्हींग इन्स्पिरेशन लॅब' या अभिनव उपक्रमाचा शुभारंभ झाला. या यात्रेचे उद्घाटन पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते झाले. पु.ना. गाडगीळचे अजित गाडगीळ तसेच ज्येष्ठ इतिहास अभ्यासक पांडुरंग बलकवडे यांच्या प्रमुख उपस्थितीत या यात्रेला सुरुवात झाली. परिमंडळ ३ चे पोलीस उपायुक्त डॉ. सागर कवडे यांच्या मार्गदर्शन व संकल्पनेतून तसेच आदर्श मित्र मंडळाचे उदय जगताप यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम साकारला आहे. यावेळी ढोल-ताशा महासंघाचे पराग ठाकूर, ज्येष्ठ शिल्पकार विवेक खटावकर, ज्येष्ठ अभ्यासक आनंद सराफ, डॉ. मिलिंद भोई, ॲड. प्रताप परदेशी, शिरीष मोहिते, सुहास एकबोटे, अजय आबा पाटील, राजू नाईकवरे, अनिरुद्ध एवले, संजय भैलुमे, राजाभाऊ कदम तसेच आदर्श मित्र मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

### समितीमध्ये घडणारी युवाशक्ती भारताच्या प्रगतीमध्ये योगदान देईल : अभय भट

**पुणे : दैनिक संध्या**



"युवापिढी प्रचंड आत्मविश्वास, जिद्द, नवतंत्रज्ञानाशी सुसंगत असलेली अशी आहे. या पिढीला योग्य दिशा मिळाली, तर देशाचा सर्वांगीण विकास झपाट्याने होईल. विद्यार्थी साहाय्यक समितीमध्ये शिक्षण, संस्कार व मूल्यांची शिकवण दिली जात आहे. भारताच्या प्रगतीमध्ये भरीव योगदान देऊ शकणारी युवाशक्ती येथे घडत आहे. त्यामुळे आपल्या देशाचे उज्ज्वल भविष्य सक्षम पिढीच्या हाती जाईल," असा विश्वास ब्रिगेडियर अभय भट (निवृत्त) यांनी व्यक्त केला. विद्यार्थी साहाय्यक समितीच्या लजपतराय विद्यार्थी संकुलात भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा झाला. प्रसंगी समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, खजिनदार संजय अमृते, वसतिगृह उपसमितीचे अध्यक्ष दिनकर वैद्य यांच्यासह विश्वस्त, कार्यकर्ते, पर्यवेक्षक, आजी-माजी विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. समितीच्या डॉ. अ. शं. आपटे वसतिगृहात कार्यकर्ते हेमंत राजहंस, सुमित्रा सदन वसतिगृह येथे कार्यकत्या वासंती नाटेकर, लाला लजपतराय भवन येथे कार्यकर्ते मधूसुदन बडवे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. "भारत आज वेगाने प्रगती करत आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, संरक्षण, उद्योग, शिक्षण आणि विविध क्षेत्रांमध्ये देशाची क्षमता जगासमोर सिद्ध होत आहे. या प्रगतीला अधिक वेग देण्याची जबाबदारी आजच्या तरुणाईवर आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा आणि कौशल्याचा उपयोग राष्ट्रनिर्मितीसाठी केला पाहिजे.

# रक्तदानातून मानवतेचा श्वास जपू : नरेंद्राचार्यजी

**परमवंदनीय समर्थ सद्गुरू काडसिद्धेश्वर महाराज यांच्या रजत पुण्यस्मृती वर्षानिमित्त 'ब्लड इन नीड' सेवेचा अखिल भारतीय विस्तार मोबाइल ॲपचे लोकार्पण**

■ पुणे (दै. संध्या)

रक्तदानातून माणसाचा श्वास आणि वृक्षसंवर्धनातून सृष्टीचा श्वास अखंड राहतो. सेवा हीच भारतीय संस्कृतीची खरी ओळख असून, आपल्याला मिळालेल्या ज्ञान, सामर्थ्य, संपत्ती आणि कर्तृत्वाचा उपयोग समाजकल्याणासाठी झाला पाहिजे. रक्तदान आणि वृक्षसंवर्धन या दोन्ही सेवा मानवतेच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या असून, या सेवायज्ञात समाजातील प्रत्येकाने सहभागी व्हावे, असे आवाहन रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांनी केले.

समर्थ सद्गुरू काडसिद्धेश्वर महाराज यांच्या रजत पुण्यस्मृती वर्षानिमित्त खराडी येथील महालक्ष्मी लॉन्स येथे 'ब्लड इन नीड' या मानवतावादी रक्तसेवेच्या देशव्यापी विस्ताराचा कार्यक्रम तसेच 'ऋणानुबंध' मोबाईल ॲप्लिकेशनचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी नरेंद्राचार्यजी बोलत होते. ज्येष्ठ अभिनेते सयाजी शिंदे, महाराष्ट्र राज्य रक्त संक्रमण परिषदेचे अध्यक्ष डॉ. सुहास मोहनळकर, वरिष्ठ पत्रकार अंकित काणे, डॉ. रचना पवार आदी उपस्थित होते.




नरेंद्राचार्यजी म्हणाले, "जीवनाची खरी समृद्धी आपण किती मिळवले यावर ठरत नाही; आपल्या अस्तित्वामुळे किती जीवांना आधार मिळाला, यावर ती ठरते. ज्याच्याकडे ज्ञान आहे त्याने ज्ञानयज्ञ करावा, ज्याच्याकडे श्रमशक्ती आहे त्याने श्रमयज्ञ करावा आणि ज्याच्याकडे संपत्ती आहे त्याने दानयज्ञ करावा. आजच्या काळात निरोगी व्यक्तीने रक्तदानाचा यज्ञ करावा आणि संवेदनशील मनाच्या प्रत्येक व्यक्तीने रक्तमित्र बनून या करुणामय सेवेत सहभागी व्हावे. एखाद्या जीवाला जीवदान मिळाले, यापेक्षा श्रेष्ठ यज्ञ दुसरा कोणताही असू शकत नाही."

सयाजी शिंदे म्हणाले, "झाड आधी आले आणि मग माणूस आला. माणूस कितीही मोठा झाला, सेलिब्रिटी झाला तरी तो ऑक्सिजन तयार करू शकत नाही. तो त्याला झाडापासूनच मिळतो. त्यामुळं झाड हेच माझ्यासाठी सेलिब्रिटी आहे.

> निरोगी असणं हीच खरी संपत्ती आहे. निरोगी माणसाने रक्तदान केल्यानंतर त्यातून जीवदानाचे काम होऊ शकते, असं डॉ. रचना पवार यांनी सांगितले. यावेळी रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांनी ॲपची कार्यप्रणाली कशी चालते, हे उपस्थितांना डेमोच्या माध्यमातून समजावून सांगितले. ब्लड इन नीड या ॲपच्या उभारणीत योगदान दिलेल्या तरुण उच्चशिक्षित सेवक-सेविकांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या ॲपवर पाच लाखांहून अधिक रक्तदाते आणि रक्तमित्र यांची नोंद झाली असून ब्लड इन नीड हे ॲप डाउनलोड करून रक्तदानाच्या या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. निवेदन श्रद्धा बोडेकर यांनी केले.

सकाळी उठल्यावर श्वास भरून ऑक्सिजन घेता येणे ही खरी श्रीमंती आहे. ही श्रीमंती टिकवण्यासाठी आपण झाडे लावली पाहिजेत." रुग्णसेवेपासून ते शेतकऱ्यांच्या सेवेपर्यंत आणि मोफत शिक्षणापासून ते वृक्षसंवर्धनापर्यंत अशा विविध क्षेत्रांमध्ये नरेंद्रचार्य महाराज यांचे कार्य बघून मी आश्चर्यचकित झालो आहे. त्यांचे कार्य केवळ एका व्यक्ती किंवा संस्थेपुरते मर्यादित नाही तर समाजाला त्यांची गरज आहे. आज ज्यावेळी माणुसकी हरवत चालली आहे अशावेळी नरेंद्राचार्य महाराजांच्या मानवतावादी कार्याची समाजाला नितांत गरज आहे असेही शिंदे यांनी नमूद केले.

अंकित काणे म्हणाले, "हिंदू धर्म हा सहिष्णू आहे. ज्याला जी गरज आहे, त्याला ती पुरवणं हा सेवाभाव आपला धर्म शिकवतो. या सेवा धर्माची जपणूक नरेंद्राचार्यजी करत आहेत. धर्माचं तत्वज्ञान कृतीत आणणाऱ्या त्यांच्या सारख्या माणसांच्या आपण मागे उभं राहिलं पाहिजे." रक्ताची गरज असलेल्या माणसाला रक्तदात्यापर्यंत पोहोचवून देण्याचं मोलाचं काम करणारे हे कदाचित पहिले ॲप असेल. शासनाच्या माध्यमातून ही संकल्पना कशी व्यापक करता येईल. या बाजूनेही प्रयत्न करणार असल्याची माहिती डॉ. मोहनाळकर यांनी दिली.

## विजयकुमार मगर यांना राष्ट्रपती पदक

■ पुणे (दै. संध्या)

राज्य राखीव पोलिस दलाच्या पुणे परिक्षेत्राचे उपमहानिरीक्षक विजयकुमार मगर यांना गुणवत्तापूर्ण सेवेसाठी राष्ट्रपती पोलिस पदक जाहीर झाले आहे. स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला विजयकुमार मगर यांना पदक जाहीर झाले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील पिंपळगाव उज्जैनी (ता. अहिल्यानगर) येथील शेतकरी कुटुंबातून आलेले विजयकुमार मगर हे कृषी आणि विधी शाखेचे पदवीधर आहेत. राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतर ते थेट पोलिस उपअधीक्षक म्हणून पोलिस सेवेत दाखल झाले. उपअधीक्षक म्हणून त्यांनी वाशिम, खेड आणि दौंड येथे, तसेच कल्याण येथे सहायक पोलिस आयुक्त म्हणून सेवा बजावली. पुणे ग्रामीण आणि नाशिक येथे अतिरिक्त पोलिस अधीक्षक म्हणून काम केल्यानंतर त्यांनी नाशिक येथे राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या अधीक्षकपदाची जबाबदारी सांभाळली. नानवीज (ता. दौंड) येथील पोलिस प्रशिक्षण विद्यालयाचे प्राचार्य म्हणून त्यांनी २०१५ ते २०१७ या कालावधीत काम पाहिले. त्यानंतर लातूर येथील पोलिस प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य म्हणून त्यांनी सेवा बजावली. सन २०१९ ते २०२० या काळात त्यांनी नांदेड जिल्ह्याचे, त्यानंतर नागपूर ग्रामीणचे पोलिस अधीक्षक म्हणून काम केले.

## वर्टस फुटबॉल अकॅडमी तरुणाईला नवी दिशा देईल – प्रशांत जगताप

**स्वातंत्र्यदिनी वडगाव शेरीत वर्टस फुटबॉल अकॅडमीचे दिमाखात उद्घाटन; युनिटी फुटबॉल कप २०२६ मध्ये विद्यांकुर स्कूल विजेता**




■ पुणे (दै. संध्या)

भारताच्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून वडगाव शेरी येथील विद्यांकुर स्कूलच्या प्रांगणात वर्टस फुटबॉल अकॅडमीचे दिमाखदार उद्घाटन करण्यात आले. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या युनिटी फुटबॉल कप २०२६ स्पर्धेलाही तरुण खेळाडूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

माजी आमदार मोहन जोशी यांनी वर्टस फुटबॉल अकॅडमीचे कौतुक करताना, ही अकॅडमी तरुणाईला, विशेषतः जेन-झी पिढीला क्रीडा, शिस्त आणि सकारात्मक विचारांची मोठी प्रेरणा देईल, असा विश्वास व्यक्त केला. या संपूर्ण उपक्रमामध्ये वर्टस फुटबॉल अकॅडमीचे संस्थापक प्रशांत (लुकस) केदारी यांची भूमिका विशेष ठरली. सामाजिक, क्रीडा, कला आणि साहित्य क्षेत्राशी जोडलेले प्रशांत केदारी यांचे नेतृत्व आणि तरुणांसाठी काहीतरी भरीव करण्याची धडपड यावेळी मान्यवरांनी अधोरेखित केली. युवा नेते अविनाश बागवे यांनीही त्यांच्या नेतृत्वाचे कौतुक करत वर्टस अकॅडमीच्या ध्येयधोरणाला शुभेच्छा दिल्या. उद्घाटनप्रसंगी काँग्रेस पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, माजी नगरसेवक अविनाश बागवे, माजी नगरसेवक राजेंद्र शिरसाठ, सुनील मलके, फादर ॲलेक्स, राहुल डबाळे, सत्यवान गायकवाड, महिला संघटक प्रतिमा केदारी, पीटर जॉर्ज, जॉन रूपवते, पुणे फूटबॉल असोसिएशन चे प्रदीप परदेशी, जॉय जोस, संजय गायकवाड, विमान नगर पोलीस स्टेशनचे पीआय अशोक शिरसाठ, रिफेन्स अल्फान्सो आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविकात प्रशांत (लुकस) केदारी यांनी वर्टस अकॅडमीचे उद्दिष्ट स्पष्ट करताना पुण्यातील तरुण खेळाडूंना फुटबॉलच्या माध्यमातून शहर, राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचविण्याचा संकल्प व्यक्त केला. अकॅडमीच्या हेड कोचपदी जोएल अलेक्स यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

युनिटी फुटबॉल कप २०२६ मध्ये पुणे शहरातील संघांनी सहभाग घेतला. अंतिम सामन्यात विद्यांकुर स्कूलने ब्लू टायगर अकॅडमीचा पराभव करून विजेतेपद पटकावले. संपूर्ण स्पर्धेत तरुण खेळाडूंनी उत्कृष्ट कौशल्य, संघभावना आणि क्रीडावृत्तीचे दर्शन घडविले.

स्पर्धेतील रेफरीची जबाबदारी गॅरी, फ्रेडी आणि जॉन केदारी यांनी सांभाळली.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ॲड. अंतोन कदम, मार्कस पंडित, जॉर्ज रॉड्रिक्स, संजय गायकवाड, जॉन रूपवते, जॉय जोस, राजेंद्र चक्रनारायण, दिलीप घुटे, अरुण केदारी, मेरी पारगे, अतुल धीवर, मेरी पारगे, नरेश चव्हाण, राजकुमार सत्राळकर, जे डी आढाव, सलोमी तोरणे, राजेंद्र चक्रनारायण, संगीता केदारी, अभिजित कांबळे, नितीन भोसले, डेव्हिस देवदास, प्रवीण मॅथ्यू, सौदागर नवगिरे, स्टॅन्ली, नितीन भोसले आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

> **तरुणांसाठी नवी संधी**
>
> वर्टस फुटबॉल अकॅडमी ही केवळ फुटबॉल प्रशिक्षण संस्था न राहता तरुणांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला, नेतृत्वगुणांना आणि क्रीडा कौशल्याला व्यासपीठ देणारे केंद्र बनविण्याचा प्रयत्न असल्याचे यावेळी स्पष्ट झाले. प्रशांत (लुकस) केदारी यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या या उपक्रमामुळे पुण्यातील अनेक होतकरू खेळाडूंना भविष्यात मोठ्या स्तरावर खेळण्याची संधी मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. "तरुणाईला मैदानाकडे आणि सकारात्मक भविष्याकडे घेऊन जाण्याचा वर्टस अकॅडमीचा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे, अशी भावना उद्घाटन सोहळ्यात उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

## मोठ्या कार्यालयीन व्यवहारांचे पुण्याच्या बाजारपेठेवर वर्चस्व कायम

■ पुणे (दै. संध्या)

**पहिल्या सहामाहीत ५७ टक्के वाटा**

पुण्याच्या कार्यालयीन जागांच्या बाजारपेठेत मोठ्या आकाराच्या कार्यालयीन व्यवहारांचे वर्चस्व कायम असून, २०२६च्या पहिल्या सहामाहीत शहरातील एकूण कार्यालयीन भाडेपट्टा व्यवहारांपैकी ५७ टक्के वाटा मोठ्या आकाराच्या कार्यालयीन जागांचा राहिला आहे. नाईट फ्रँक इंडियाच्या अहवालानुसार, २०२६च्या पहिल्या सहामाहीत पुण्यातील एकूण कार्यालयीन भाडेपट्टा व्यवहार ६.६ दशलक्ष चौरस फुटांवर पोहोचले असून, मागील वर्षाच्या तुलनेत त्यात जवळपास ३० टक्क्यांची वाढ झाली आहे. एक लाख चौरस फुटांपेक्षा अधिक आकाराच्या कार्यालयीन जागांच्या भाडेपट्ट्यात वार्षिक तुलनेत ३३ टक्क्यांची वाढ झाली. २०२५च्या पहिल्या सहामाहीत या विभागात २.८ दशलक्ष चौरस फुटांचे व्यवहार झाले होते. यंदाच्या पहिल्या सहामाहीत हे प्रमाण वाढून ३.८ दशलक्ष चौरस फुटांवर पोहोचले आहे. मोठ्या आकाराच्या कार्यालयीन व्यवहारांमध्ये झालेल्या या वाढीमुळे पुण्यातील एकूण कार्यालयीन भाडेपट्टा व्यवहारांनाही मोठी चालना मिळाली. २०२५च्या पहिल्या सहामाहीतील ५.१ दशलक्ष चौरस फुटांच्या तुलनेत यंदाच्या पहिल्या सहामाहीत एकूण व्यवहार ६.६ दशलक्ष चौरस फुटांवर पोहोचले. त्यामुळे पुण्याच्या कार्यालयीन बाजारपेठेवरील भाडेकरूंचा विश्वास कायम असल्याचे स्पष्ट होत आहे. पुण्यातील मध्यम आकाराच्या कार्यालयीन जागांच्या भाडेपट्ट्यांनीही २०२६च्या पहिल्या सहामाहीत महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. ५० हजार ते एक लाख चौरस फुटांच्या कार्यालयीन जागांच्या भाडेपट्ट्यात मागील वर्षाच्या तुलनेत २७ टक्क्यांची वाढ झाली. २०२५च्या पहिल्या सहामाहीत या विभागात ०.९४ दशलक्ष चौरस फुटांचे व्यवहार झाले होते. २०२६च्या पहिल्या सहामाहीत हे प्रमाण वाढून १.१९ दशलक्ष चौरस फुटांवर पोहोचले.

## बाळाच्या आयुष्यातील पहिली भेट शुद्धतेची

■ पुणे (दै. संध्या)



नवजात बाळासाठी दिली जाणारी पहिली भेट ही केवळ एक वस्तू नसून, त्यामागे प्रेम, काळजी आणि शुभेच्छांची भावना असते. हीच भावना केंद्रस्थानी ठेवत हिमालया बेबीकेअरने 'हिमालया बेबी प्युअर बिगिनिंग्स घी गिफ्ट पॅक' या नव्या भेट संचासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित जाहिरात मोहीम सुरू केली आहे. भारतीय कुटुंबांमध्ये नवजात बाळाच्या आगमनाला विशेष महत्त्व असते. बाळाला दिली जाणारी भेट ही सांस्कृतिक परंपरा, जिव्हाळा आणि आशीर्वादाचे प्रतीक मानली जाते. याच भावनेला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत हिमालया बेबीकेअरने या मोहिमेत कथाकथनाच्या माध्यमातून बाळाच्या आयुष्याच्या सुरुवातीच्या काळातील काळजी अधोरेखित केली आहे. नवजात बाळासाठी सुरक्षित, सौम्य आणि अर्थपूर्ण उत्पादने निवडण्याकडे आजच्या पालकांचा वाढता कल आहे. याच बदलत्या पसंतीचा विचार करून 'प्युअर बिगिनिंग्स घी गिफ्ट पॅक' हा आकर्षक आणि प्रीमियम भेट पर्याय म्हणून सादर करण्यात आला आहे.

# 'ब्लड इन नीड' सेवेचा देशभर विस्तार; १६ ऑगस्टला मोबाइल ॲपचे लोकार्पण

■ पुणे (दै. संध्या)

परमवंदनीय समर्थ सद्गुरू काडसिद्धेश्वर महाराज यांच्या रजत पुण्यस्मृती वर्षानिमित्त 'ब्लड इन नीड' या मानवतावादी सेवेचा अखिल भारतीय विस्तार जाहीर करण्यात येणार आहे. यानिमित्त विकसित करण्यात आलेल्या 'ब्लड इन नीड' मोबाइल ॲपचे लोकार्पण रविवार, १६ ऑगस्ट रोजी पुण्यात करण्यात येणार आहे. अशी माहिती जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थानचे विश्वस्त श्री. अर्जुन फुले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी जगद्गुरू रामानंदाचार्य पीठाचे श्री. कमलाकर हजारे, जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थानचे प्रसिद्धी प्रमुख श्री. राजन बोडेकर आदी मान्यवर उपस्थित होते. जगद्गुरू श्रीमद रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या प्रेरणेतून गेल्या अनेक वर्षांपासून ही सेवा कार्यरत आहे. २ ऑक्टोबर २०११ रोजी सुरू झालेल्या या उपक्रमाच्या माध्यमातून आतापर्यंत २७ हजार २८८ हून अधिक गरजू रुग्णांना विनामूल्य रक्त उपलब्ध करून देण्यात आले आहे. या सेवेमुळे अनेक रुग्णांचे प्राण वाचविण्यास मोलाची मदत झाली आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ही सेवा देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचविण्याच्या उद्देशाने मोबाइल ॲप विकसित करण्यात आले आहे. या ॲपद्वारे गरजू रुग्ण, रक्तदाते, स्वयंसेवक आणि रक्तपेढ्या यांच्यात तातडीने समन्वय साधता येणार असून, रक्ताच्या शोधासाठी होणारी धावपळ मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होणार आहे. या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य रक्त संक्रमण परिषदेचे अध्यक्ष डॉ. सुहास मोहनळकर, ROTO–SOTTO चे नोडल अधिकारी डॉ. आकाश शुक्ला, पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने, ज्येष्ठ अभिनेते व पर्यावरण संवर्धक सयाजी शिंदे, 'सकाळ' माध्यम समूहाचे संपादक (मल्टीमीडिया) अंकित काणे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.




या सोहळ्यात रक्तदान, देहदान, अवयवदान, विनामूल्य रुग्णवाहिका सेवा, व्यसनमुक्ती, पर्यावरण संवर्धन, जलसंधारण आणि शिक्षण आदी समाजोपयोगी उपक्रमांची माहिती देण्यात येणार आहे. तसेच 'ब्लड इन नीड' मोबाइल ॲपची प्रत्यक्ष माहिती व प्रात्यक्षिक सादर केले जाणार आहे. मुख्य लोकार्पण सोहळा १६ ऑगस्ट रोजी दुपारी २ ते ४ या वेळेत महालक्ष्मी लॉन्स, पुणे-नगर रोड, खराडी बायपासजवळ, जुना जकात नाक्यासमोर, पुणे येथे होणार आहे.

या स्मृतिसोहळ्याची सुरुवात पहाटे काकड आरतीने होणार असून, त्यानंतर पादुकांची षोडशोपचार महापूजा, भजन, संत-महंत व मान्यवरांची समाजप्रबोधनपर प्रवचने, पादुकांची परिक्रमा आणि सांजआरती असे विविध कार्यक्रम होणार आहेत. रात्री जगद्गुरू श्रीमद्रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांचे मार्गदर्शनपर प्रवचन होणार आहे.

दैनिक संध्या | सोमवार, दि. १७ ऑगस्ट २०२६



## थोडक्यात पण महत्वाचे



### कामगार नेते यशवंत भोसले यांच्या नेतृत्वाखालील भव्य तिरंगा रॅली

पिंपरी / दै. संध्या

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनानुसार संत तुकाराम नगर मध्ये (दि.१५) रोजी भव्य तिरंगा रॅली राष्ट्रीय श्रमिक आघाडी, भारतीय जनता पार्टी पिंपरी चिंचवड शहर आणि संत तुकाराम नगर सहकारी गृहरचना संस्था मर्यादितच्या वतीने राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे संस्थापक अध्यक्ष तथा कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांच्या नेतृत्वात काढण्यात आली. या रॅलीला भोसरी मतदारसंघाचे आमदार महेशदादा लांडगे, विधान परिषद आमदार अमित गोरखे,शहराध्यक्ष शत्रुघ्न बापू काटे, सदाशिव खाडे, पक्षनेते प्रशांत शितोळे,अजीज भाई शेख आधी मान्यवर उपस्थित होते.रॅलीमध्ये हजारोच्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. संत तुकाराम नगर येथील राष्ट्रीय श्रमिक आघाडीच्या कार्यालयापासून रॅलीला सुरुवात झाली. रॅली पंचशील बुद्ध विहार मार्गे संत तुकाराम नगर पोलीस स्टेशन, मैत्री चौक, जिरे टोपी चौक मार्गे , महेश नगर, डी वाय पाटील हॉस्पिटल ,वायसीएम हॉस्पिटल मार्गे आचार्य अत्रे सभागृह, वल्लभ नगर, हुतात्मा चौक मार्गे साईबाबा मंदिर, शनी मंदिर चौक मार्गे रॅलीचे श्रमिक आघाडीचे कार्यालय येथे सभेत रूपांतर झाले. यावेळी आमदार अमित गोरखे म्हणाले की, देशभक्तीचा उत्साह आणि भारतमातेविषयीचे प्रेम व्यक्त करत कामगार नेते तथा भाजपाचे नेते यशवंतजी भोसले यांच्या नेतृत्वाखाली भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मोठ्या संख्येने नागरिकांनी हातात तिरंगा घेत रॅलीमध्ये सहभाग नोंदवला.यशवंत भोसले हे सातत्याने विविध सामाजिक उपक्रम राबवत असतात. मात्र, भारतमातेविषयी असलेले त्यांचे प्रेम आणि देशभक्तीची भावना या तिरंगा रॅलीतून प्रकर्षाने दिसून आली. स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या या रॅलीत नागरिकांचा मोठा जनसमुदाय सहभागी झाला.रॅलीमध्ये विशेषतः महिलांचा सहभाग लक्षवेधी ठरला. वयाची तमा न बाळगता अनेक ज्येष्ठ महिलांनीही तब्बल पाच ते सहा किलोमीटर पायी चालत या रॅलीत सहभाग घेतला. यशवंत भोसले यांच्यावरील विश्वास आणि देशाविषयी असलेल्या प्रेमातून नागरिकांनी उत्स्फूर्तपणे रॅलीत सहभागी होत देशभक्तीचा संदेश दिला. कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांनी सांगितले की,देशाच्या ८०व्या स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत पिंपरी-चिंचवडमध्ये भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.भारतीय जनता पार्टी पिंपरी-चिंचवड शहर, राष्ट्रीय श्रमिक आघाडी, संत तुकाराम नगर सहकारी गृह रचना संस्था तसेच स्थानिक मंडळे आणि विविध कार्यकर्त्यांच्या सहकार्याने या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. हातात तिरंगा घेऊन मोठ्या संख्येने महिला, युवक, कामगार, श्रमिक आणि स्थानिक नागरिक रॅलीमध्ये सहभागी झाले.देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांचे स्मरण नव्या पिढीला व्हावे, त्याग आणि बलिदानाची जाणीव तरुणांमध्ये निर्माण व्हावी, या उद्देशाने देशभर तिरंगा रॅलीचे आयोजन केले जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेले आवाहन जनतेने मोठ्या उत्साहाने स्वीकारले असून, या उपक्रमामुळे नागरिकांच्या मनात पुन्हा एकदा देशप्रेमाची भावना जागृत झाली आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, गाव मौजे ओतूर, ता. जुन्नर, जि. पुणे येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या नवीन शर्तीच्या (इनाम वर्ग ६ब) मिळकती या अनुक्रमे नं. १) शंकुतला वसंत फुलपगार २) शितल सुभाष माळवे ३) अक्षय सुभाष माळवे ४) आनंद खंडू सोनवणे ५) श्वेता दयानंद सोनवणे ६) जिया दयानंद सोनवणे ७) रिध्दी दयानंद सोनवणे अ.पा.क. आई श्वेता सोनवणे ८) शालिनी अनिल चव्हाण ९) मालिनी सतिश सकपाळ यांचे सामईक मालकीची असून सदर मिळकत ते १) संगिता बबनराव थोरात व २) विमल रोहीदास ढमाले यांना अनुक्रमे रक्कम रूपये ९,००,०००/- (अक्षरी र. रू. नऊ लाख फक्त) यांस विक्री करणार असून, त्याबाबत त्यांची बोलणी चालू आहे. त्यांनी सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध व निजोखमी असल्याचा भरोसा आमचे आशिलांना दिलेला आहे. तसेच सदर मिळकतीवर कोणाचेही बक्षिस, गहाण, दान, लिज, पोटगी, चोळी बांगडी, खरेदी, साठेखत करार मदार, कुळ वहिवाट, विसार पावती इतर कोणत्याही स्वरूपाचे हक्क हितसंबंध नसल्याचा त्यांनी आमचे आशिलांना भरोसा दिलेला आहे. सदर मिळकतीबाबत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार किंवा हरकत असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत मा. जिल्हा अधिकारी कुळकायदा शाखा पुणे, तहसिलदार कार्यालय जुन्नर यांची मुळ कागदपत्रांनिशी खात्री पटवून दयावी. अन्यथा सदर मिळकतीत कोणाचेही हक्क, हितसंबंध नाहीत. व असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत. असे समजून आमचे आशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व नंतर कुणाचीही तक्रार चालणार नाही. याची नोंद घेण्यात यावी. शासन परिपत्रक नं. डब्ल्यूटीएन २०१९/सी आर/२२९/एल. ४ दि. १० मार्च २००२मधील मुंबई गावची कनिष्ट वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम १९५८ मधील दिलेल्या सुचनेनुसार गावच्या १५ कि. मी. परिसरातील इतर वतनदार प्रश्नाधिन जमीन उक्त नमुद किंमतीत खरेदी करणेस इच्छूक असल्यास लेखी स्वरूपात १५ दिवसाचे आत तहसिलदार कार्यालय जुन्नर, मा. जिल्हा अधिकारी कुळ कायदा शाखा पुणे यांना कळवावे.

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन - गाव मौजे ओतूर, ता. जुन्नर, जि. पुणे येथील सामाईक क्षेत्र-

१) खाते नं. ६६७१ वरील सर्वे नं. ७६३/११ क्षेत्र ०.०८ आर यापैकी लिहून देणार यांचे अविभक्त हिश्याचे संपूर्ण क्षेत्र.

२) खाते नं. ६६७२ वरील सर्वे नं. ७६३/१६ क्षेत्र ०.२५ आर यापैकी लिहून देणार यांचे अविभक्त हिश्याचे संपूर्ण क्षेत्र.

३) खाते नं. ६६७३ वरील सर्वे नं. ७६३/२७ क्षेत्र ०.२३ आर यापैकी लिहून देणार यांचे अविभक्त हिश्याचे संपूर्ण क्षेत्र.

४) खाते नं. ६६७४ वरील सर्वे नं. ७६३/२९ क्षेत्र ०.३७ आर यापैकी लिहून देणार यांचे अविभक्त हिश्याचे संपूर्ण क्षेत्र.

५) खाते नं. ५१८८ वरील सर्वे नं. ७६३/२० क्षेत्र ०.२८ आर यापैकी लिहून देणार यांचे अविभक्त हिश्याचे संपूर्ण क्षेत्र.

दि. १४/०८/२०२६ येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत.

कळावे

ॲडव्होकेट

ॲड. रोहीणी लक्ष्मण गाडेकर

रा. ओतूर, ता. जुन्नर, जि. पुणे

मो.नं. ९८६०४८३०३१


# सीमांकन विधेयकावर विरोधकांनी केंद्राचा डाव कसा उधळला?

■ मुंबई (दै. संध्या)

लोकसभा मतदारसंघांच्या संभाव्य पुनर्रचनेशी संबंधित सीमांकन विधेयक आणि महिला आरक्षणाचा मुद्दा सध्या राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी केंद्र सरकारच्या रणनीतीबाबत भूमिका मांडली आहे. हे विधेयक विरोधकांच्या एकजुटीमुळे संसदेत मंजूर होऊ शकले नाही असं त्यांनी म्हटलं.



१७ एप्रिल २०२६ रोजी लोकसभेत सीमांकन आणि महिला आरक्षणाशी संबंधित संविधान दुरुस्ती विधेयकावर मतदान झाले. या मतदानात एकूण ५२८ खासदार सहभागी झाले होते. परंतु काँग्रेस, समाजवादी पक्ष, एनसीपी आणि डीएमकेच्या खासदारांनी सभागृहात सरकारविरोधात मतदान केले. सभागृहात दोन तृतीयांश बहुमताची आवश्यकता असल्याने सरकारला हे विधेयक सभागृहात मांडता आले नाही. त्यामुळे १७ एप्रिलला सरकारला मोठा धक्का बसला. मतदानात विधेयकाच्या बाजूने २९८ मते पडली तर २३० खासदारांनी विरोधात मतदान केले. घटनादुरुस्ती विधेयकासाठी आवश्यक दोन-तृतीयांश बहुमताचा आकडा ३५२ होता. त्यामुळे विधेयकाला आवश्यक बहुमत मिळवण्यात केंद्र सरकारला अपयश आले. काँग्रेसच्या म्हणण्यानुसार, समाजवादी पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस आणि द्रमुकसह काही विरोधी पक्षांनी या मुद्द्यावर एकत्रित भूमिका घेतली. जयराम रमेश यांनी या पक्षांच्या समन्वयाचा उल्लेख केला आहे. DMK सोबत आम्ही दुरावलो असलो तरी या मुद्द्यावर आम्ही एकत्र राहिलो. DMK सह दुसऱ्या विरोधी पक्षाची साथही सरकारला मिळाली नाही. तामिळनाडू विधानसभेत मंजूर झालेल्या ठरावाचाही उल्लेख जयराम रमेश यांनी केला. मतदारसंघांची पुनर्रचना होऊ नये , लोकसभेच्या सध्याच्या ५४३ जागा कायम राहाव्यात, राज्यांच्या प्रतिनिधित्वात कोणताही बदल होऊ नये आणि महिलांसाठी एक तृतीयांश आरक्षण लागू केले जावे असा प्रस्ताव तामिळनाडूत मंजूर झाला. तामिळनाडू विधानसभेचा ठराव आणि महिलांसाठी एक-तृतीयांश आरक्षण लागू करण्याची मागणी या काँग्रेस पक्षाच्या प्रमुख मागण्या आहेत. सरकारला धक्का बसला आहे पण आता ते न्यूज आणि नॅरेटिव्ह मॅनेजमेंट करण्यात गुंतले आहेत आणि विरोधी पक्षांवर दोषारोप ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत परंतु हे आरोप खरे नाही असं त्यांनी म्हटलं. त्याशिवाय केंद्र सरकारची संपूर्ण रणनीती अयशस्वी झाली आहे. सरकारला अपेक्षित असलेले दोन-तृतीयांश बहुमत मिळवण्यात ते अयशस्वी ठरले. १७ एप्रिल रोजी विधेयक मंजूर न झाल्याने त्यांना मोठा धक्का बसला आणि तसेच पावसाळी अधिवेशनातही झाले. सीमांकन विधेयकाबरोबरच महिला आरक्षण हा या विधेयकातील महत्त्वाचा मुद्दा आहे. काँग्रेसची मागणी सध्याच्या लोकसभा जागांच्या चौकटीतच एक-तृतीयांश महिला आरक्षण लागू करण्याची असल्याचे काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी स्पष्ट सांगितले. विधेयकाला आवश्यक दोन-तृतीयांश बहुमत न मिळाल्याचा दाखला देत जयराम रमेश यांनी केंद्र सरकारच्या रणनीतीवर टीका केली. विरोधकांच्या एकजुटीमुळे सरकारला विधेयक मंजूर करून घेता आले नाही असं सांगत त्यांनी भाजपावर टीका केली. सीमांकन, लोकसभेतील जागांची संख्या आणि महिला आरक्षण या तीन मुद्द्यांवर विरोधकांनी सरकारविरोधात आक्रमक रणनीती अवलंबली आहे.

## मोबएव्हेन्यू एआय टेकच्या महसुलात ५६.९ टक्के वाढ; नफा जवळपास दुप्पट

■ मुंबई (दै. संध्या)

मोबएव्हेन्यू एआय टेक लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२७च्या पहिल्या तिमाहीत दमदार आर्थिक कामगिरी नोंदवली आहे. ३० जून २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीत कंपनीचा महसूल ५६.९ टक्क्यांनी वाढून ७२.८ कोटी रुपये झाला. करानंतरचा नफा जवळपास दुप्पट होऊन ११.७ कोटी रुपयांवर पोहोचला, तर व्याज, कर, घसारा आणि कर्जखर्चापूर्वीचा नफा ७७ टक्क्यांनी वाढून १५.४ कोटी रुपये झाला. या नफ्याचे प्रमाण २१.२ टक्के राहिले. महसुलाच्या तुलनेत नफ्यात अधिक वेगाने वाढ झाल्याने कंपनीच्या कार्यक्षमतेत सुधारणा झाल्याचे दिसून आले. सॉफ्टवेअरवर आधारित व्यवसाय पद्धतीमुळे खर्चात त्याच प्रमाणात वाढ न करता व्यवसायाचा विस्तार करणे कंपनीला शक्य झाले. क्विक कॉमर्स, बँकिंग-वित्तीय सेवा-विमा, वित्तीय तंत्रज्ञान आणि किरकोळ विक्री यांसारख्या वेगाने वाढणाऱ्या क्षेत्रांतील थेट जाहिरातदारांकडून मिळालेली मागणी तसेच पुनर्विक्रेता आणि जाहिरात संस्थांच्या



माध्यमातून मिळालेले जागतिक ग्राहक ही कंपनीच्या वाढीची प्रमुख कारणे ठरली. एकूण महसुलात थेट ग्राहकांचा वाटा ६५.२ टक्के राहिला. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील महसुलाचा वाटा २०.७ टक्क्यांवर पोहोचला असून, आर्थिक वर्ष २०२६ मध्ये तो ११.५ टक्के होता. भारताचा महसुलातील वाटा ७९.३ टक्के राहिला. डेटा आणि कार्यकारी खर्चाच्या तुलनेत महसूल अधिक वेगाने वाढल्याने नफा आणि कार्यकारी नफ्याच्या प्रमाणात सुधारणा झाली.

## आईकू जेड ११ विद्यार्थ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा नवा अनुभव देणार

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

उच्च कार्यक्षमतेच्या स्मार्टफोनसाठी ओळखल्या जाणाऱ्या आईकू कंपनीने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून आपला नवीन आईकू जेड ११ स्मार्टफोन सादर करण्याची घोषणा केली आहे. हा स्मार्टफोन २० ऑगस्ट रोजी भारतीय बाजारपेठेत दाखल होणार असून, त्याची किंमत ४० हजार रुपयांपेक्षा कमी असणार आहे.

अभ्यास, टिपणे तयार करणे, मजकूर निर्मिती, माहिती शोधणे आणि एकाच वेळी अनेक कामे करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा स्मार्टफोन विशेषतः तयार करण्यात आला आहे. अधिक वेगवान आणि अधिक हुशार कृत्रिम बुद्धिमत्तेचा अनुभव देण्याच्या उद्देशाने त्याची रचना करण्यात आली आहे.

आईकू जेड ११ मध्ये विद्यार्थ्यांच्या दैनंदिन गरजा लक्षात घेऊन अनेक कृत्रिम बुद्धिमत्ता सुविधा देण्यात आल्या आहेत. त्यातील 'एआय कॅप्शन्स' सुविधा गूगल जेमिनी आणि मायक्रोसॉफ्ट अझूर या तंत्रज्ञानांना एकत्रित करून जलद आणि अचूक ध्वनीचे लिखित रूपांतर तसेच




भाषांतर करण्यास मदत करते. वर्गातील व्याख्याने, कार्यशाळा आणि चर्चांदरम्यान बोलण्याची पद्धत, लय, महत्त्वाचे मुद्दे आणि उच्चार समजून घेऊन त्यातील आवश्यक माहिती टिपण्यास ही सुविधा मदत करणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना नंतर अभ्यास करताना महत्त्वाचे मुद्दे पुन्हा पाहणे सोपे होणार आहे. 'एआय क्रिएशन' सुविधेच्या माध्यमातून मोठ्या दस्तऐवजांचा संक्षेप तयार करणे, अभ्यासक्रमाशी संबंधित कामात सुधारणा करणे, नव्या कल्पना सुचवणे आणि मजकूर तयार करणे शक्य होणार आहे. कौशल्याधारित कृत्रिम बुद्धिमत्ता मार्गदर्शन तंत्रज्ञानामुळे लेखन, संक्षेप, विचारमंथन आणि सामान्य मजकूर निर्मिती अशा विविध कामांसाठी योग्य कृत्रिम बुद्धिमत्ता प्रारूपाचा वापर केला जाणार आहे. त्यामुळे प्रत्येक कामासाठी अधिक परिणामकारक प्रतिसाद मिळण्यास मदत होणार आहे. प्रत्यक्ष वेळेतील प्रवाहाधारित कृत्रिम बुद्धिमत्ता रचनेमुळे ध्वनीचे लिखित रूपांतर आणि भाषांतर जलद गतीने करता येणार आहे. संभाषणक्षम कृत्रिम बुद्धिमत्ता सुविधेमुळे आधीची माहिती पुन्हा सुरुवातीपासून देण्याची गरज न पडता पुढील प्रश्न किंवा सूचना देऊन तयार झालेला मजकूर अधिक चांगला करता येणार आहे. 'सर्कल-टू-सर्च' सुविधेसह या सर्व तंत्रज्ञानामुळे विद्यार्थ्यांना जलद माहिती शोधणे, अनेक भाषांमध्ये संवाद साधणे, स्वतःचा मजकूर तयार करणे आणि त्यात सुधारणा करणे अधिक सोपे होणार आहे. आईकू जेड ११ हा भारतातील मीडियाटेक डायमेंसिटी ७५०० टर्बो प्रक्रियकावर आधारित पहिला स्मार्टफोन असल्याचा कंपनीचा दावा आहे. यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी स्वतंत्र हार्डवेअर देण्यात आले असून, मागील पिढीच्या तुलनेत कृत्रिम बुद्धिमत्ता कार्यक्षमतेत दुप्पट सुधारणा झाल्याचे कंपनीने म्हटले आहे.

## चाकण एमआयडीसीवरून शरद पवार-फडणवीस आमनेसामने; उद्योग स्थलांतराच्या पार्श्वभूमीवर सरकार ॲक्शन मोडवर

■ पुणे (दै. संध्या)

मर्सिडीज बेंझ, फोक्सवॅगन, स्कोडा आणि ह्युंदाई यांसारख्या जागतिक कंपन्यांमुळे देशाच्या औद्योगिक नकाशावर महत्त्वाचे स्थान निर्माण केलेल्या चाकण एमआयडीसीतील पायाभूत सुविधांच्या प्रश्नावरून राज्यातील राजकारण तापले आहे. रस्त्यांची दुरवस्था, अभूतपूर्व वाहतूक कोंडी, प्रदूषण, पाणी आणि वीजपुरवठ्याच्या समस्यांमुळे चाकणमधील सुमारे २० लघुउद्योग स्थलांतराच्या तयारीत असल्याचे समोर आल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी सरकारवर निशाणा साधला. त्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर देत समस्या मान्य केल्या असून, उद्योग टिकवण्यासाठी सरकारकडून उपाययोजना सुरू असल्याचे स्पष्ट केले.

चाकण एमआयडीसीतील २० कंपन्या सातारा जिल्ह्यातील खंडाळा एमआयडीसीमध्ये स्थलांतर करण्याच्या तयारीत असल्याचे सांगितले जात आहे. यासाठी संबंधित उद्योगांनी संघटना स्थापन करून जागा मिळविण्यासाठी प्रशासकीय पातळीवर हालचाली सुरू केल्या आहेत. हे उद्योग स्थलांतरित झाल्यास सुमारे एक हजार कोटी रुपयांच्या उलाढालीवर परिणाम होण्याची तसेच हजारो कामगारांच्या रोजगारावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे चाकणच्या औद्योगिक विकासासमोरील हा मोठा धोका मानला जात आहे.

### सुनेत्रा पवारांकडून उद्योजकांना दिलासा

दरम्यान, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीही चाकण एमआयडीसीतील समस्यांची तातडीने दखल घेतली आहे. रस्ते, वाहतूक तसेच अन्य पायाभूत सुविधांशी संबंधित प्रश्न प्राधान्याने सोडवण्यात येतील, असे त्यांनी स्पष्ट केले. या समस्यांवर तातडीने मार्ग काढण्यासाठी चाकणमधील उद्योजक, एमआयडीसीचे वरिष्ठ अधिकारी, स्थानिक प्रशासन आणि जिल्हा प्रशासनाची लवकरच बैठक घेण्यात येणार आहे. चाकण नागरी कृती समिती तसेच औद्योगिक संघटनांच्या प्रतिनिधींशी चर्चा करून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्याचे सुनेत्रा पवार यांनी सांगितले. या संदर्भात एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्रसिंह कुशवाह, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, पीएमआरडीए आयुक्त अभिजीत चौधरी, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, खेडचे प्रांत अधिकारी अनिल दौंडे आणि चाकण नगर परिषदेचे मुख्याधिकारी अंकुश जाधव यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. चाकणच्या औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी पायाभूत सुविधा सक्षम करणे ही सरकारची प्राथमिकता असल्याचे सुनेत्रा पवार यांनी सांगितले. सर्व संबंधित यंत्रणांना विश्वासात घेऊन समन्वयाने काम करत या प्रश्नांवर लवकरच ठोस तोडगा काढण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

## ४९ दिवसांची गूढ कहाणी अखेर न्यायालयात संपली

■ वडोदरा (दै. संध्या)

गुजरातमधील बहुचर्चित स्वीटी पटेल हत्याकांडाचा तब्बल पाच वर्षांनंतर निकाल लागला आहे. २०२१ मध्ये बेपत्ता झालेल्या स्वीटी पटेल यांच्या हत्या प्रकरणात वडोदरा जिल्ह्यातील करजण कोर्टाने त्यांचे पती आणि तत्कालीन पोलीस निरीक्षक अजय अमृत देसाईला दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली. या प्रकरणातील सहआरोपी किरीटसिंह जडेजा यालाही कोर्टाने पाच वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. १४ ऑगस्ट २०२६ रोजी हा निकाल देण्यात आला.

स्वीटी पटेल या आनंद जिल्ह्यातील उमरेठ तालुक्यातील पणसोरा गावातील रहिवासी होत्या. कॉलेजमध्ये असताना त्यांचे गावातील हेतस महेश पंड्या यांच्याशी प्रेमसंबंध निर्माण झाले. त्यानंतर दोघांनी लग्न केले. या विवाहातून त्यांना दोन मुले झाली. मात्र काही वर्षांतच दोघांच्या नात्यात मतभेद निर्माण झाले आणि २०१४ मध्ये त्यांचा घटस्फोट झाला. घटस्फोटानंतर २०१५ मध्ये स्वीटी यांची अजय देसाई याच्याशी ओळख झाली. त्यावेळी अजय हे अहमदाबाद रुरल पोलिसांच्या LIB विभागात PSI म्हणून कार्यरत होते. एका 'माइंड पॉवर' कार्यक्रमादरम्यान दोघांची भेट झाली आणि पुढे त्यांच्यातील संबंध वाढत गेले. २०१६ मध्ये स्वीटी आणि अजय यांनी रूपाल गावातील एका मंदिरात लग्न केल्याचे समोर आले. मात्र त्यानंतर अजय यांनी आपल्या समाजातील दुसऱ्या एका महिलेशीही विवाह केला. त्यामुळे स्वीटी आणि अजय यांच्या नात्यात तणाव निर्माण झाला. स्वीटी आपल्या नात्याचा आणि आपल्या हक्काचा प्रश्न उपस्थित करत असल्याचे तपास यंत्रणेकडून सांगण्यात आले होते. २०१९ मध्ये स्वीटी यांनी अजय यांच्या मुलाला जन्म दिला. त्यामुळे त्या तीन मुलांची आई झाल्या. मात्र एकीकडे कुटुंब आणि दुसरीकडे गुंतागुंतीचे वैवाहिक संबंध यामुळे परिस्थिती अधिकच तणावपूर्ण होत गेली. ४ जून २०२१ रोजी रात्री करजणमधील प्रयोशा सोसायटीतील घरात स्वीटी आणि अजय यांच्यात वाद झाला.

# सरकारचं २५०० कोटींचं नुकसान टळलं, DRI ने केला पर्दाफाश

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

सुपारी आयातीच्या माध्यमातून कस्टम ड्युटी चुकवण्याचा मोठा प्रकार महसूल गुप्तचर संचालनालयाने (DRI) उघडकीस आणला आहे. दक्षिण-पूर्व आशियातील देशांतून सुपारी आयात करून ती बांगलादेशातून आलेली असल्याचे दाखवून SAFTA अंतर्गत मिळणाऱ्या कस्टम ड्युटी सवलतीचा कथित गैरवापर करण्यात आल्याचे तपासात समोर आले आहे. या प्रकारामुळे सरकारला २५०० कोटींपेक्षा अधिक संभाव्य महसूल तोटा झाल्याचे DRIच्या तपासातून समोर आले. या प्रकरणात आतापर्यंत नऊ जणांना अटक करण्यात आली आहे.

भारतामध्ये सुपारीच्या आयातीवर १०० टक्के बेसिक कस्टम ड्युटी लागू होते. मात्र SAFTA अंतर्गत पात्र देशांकडून होणाऱ्या काही आयातींना नियमांनुसार कस्टम ड्युटीमध्ये सवलत मिळू शकते.

बांगलादेशातून येणाऱ्या सुपारीलाही या व्यवस्थेचा लाभ मिळतो. याच सवलतीचा गैरवापर केल्याचा आरोप तपास यंत्रणेने केला आहे. काही टोळ्या या सवलतीचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर करत असल्याची गुप्त माहिती डीआरआयला मिळाली होती. आरोपी इंडोनेशिया, थायलंड, मलेशिया आणि इतर आशियाई देशांमधून सुपारी खरेदी करत होते. मात्र भारतात आयात करताना ही सुपारी बांगलादेशची असल्याचं दाखवत होते. या तपासात DRIने कोलकाता आणि विशाखापत्तनम येथे विविध ठिकाणी छापेमारी केली.



### सरकारच्या महसुलाला मोठा फटका

दरम्यान, आरोपींनी लढवलेल्या या युक्तीमुळे कस्टम ड्युटी टाळली जायची आणि सरकारचे जवळपास २५०० कोटींहून अधिक संभाव्य नुकसान झाले असते हे DRI तपासात पुढे आले. त्याशिवाय देशातील कायदेशीर सुपारी व्यवसाय आणि स्थानिक उत्पादकांवर परिणाम होत असल्याचे म्हटले आहे. बेकायदा किंवा कमी शुल्कात आयात झालेली सुपारी बाजारात तुलनेने कमी किमतीत उपलब्ध झाल्यास देशातील उत्पादक आणि कायदेशीर आयातदारांसमोर स्पर्धेचे आव्हान निर्माण होऊ शकते. DRI च्या २०२४-२५ च्या रिपोर्टमध्येही सुपारीच्या बेकायदा आयातीची अनेक प्रकरणे नोंदवण्यात आली आहेत. त्या आर्थिक वर्षात DRI ने विविध कारवायांमध्ये ४,६१३ मेट्रिक टन सुपारी जप्त केली असून तिची किंमत सुमारे २३४ कोटी असल्याचे अधिकृत रिपोर्टमध्ये नमूद आहे. आयातदार, कस्टम ब्रोकर आणि IEC धारकांशी संबंधित ठिकाणी एकाच वेळी शोधमोहीम राबवण्यात आली. या कारवाईत सुमारे ७५ लाखांची रोकड जप्त करण्यात आली. याशिवाय जवळपास १६० मेट्रिक टन सुपारीची खेपही जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणात बांगलादेशी अधिकाऱ्यांकडून कथितरीत्या SAFTA Certificate of Origin मिळवण्यात आले. या प्रमाणपत्रांच्या आधारे भारतीय आयातदारांना कस्टम ड्युटीमध्ये सवलत मिळत होती असा DRIचा आरोप आहे.





## थोडक्यात पण महत्वाचे



### स्वातंत्र्यदिनानिमित्त ‘रिअल हिरोज’ पोलीस अधिकाऱ्यांचा विशेष सत्कार

**पिंपरी : दैनिक संध्या**

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधत पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट महासंघ मर्यादित (शाखा : चिखली-मोशी) यांच्या वतीने सामाजिक बांधिलकी आणि नागरिक सुरक्षेचा संदेश देणारा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. महासंघाच्या पदाधिकारी व सदस्यांनी चिखली, एमआयडीसी भोसरी आणि दिघी पोलीस ठाणे तसेच संबंधित उपायुक्त (DCP) कार्यालयाला भेट देऊन स्वातंत्र्यदिन साजरा केला आणि पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा विशेष सत्कार केला. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी चोवीस तास कर्तव्य बजावणाऱ्या पोलीस बांधवांच्या निःस्वार्थ सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ‘रिअल हिरोज’ या संकल्पनेअंतर्गत हा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास पुणे जिल्हा व महाराष्ट्र राज्य अध्यक्ष सुहास पटवर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली चिखली-मोशी शाखेच्या कार्यकारिणी सदस्यांची उपस्थिती होती. यामध्ये आशिष सातकर, विजय महाजन, ॲड. नितीन शिला, लक्ष्मण इंदोरे, विनायक जगताप, आशा वाबळे, सुभाष गारगोटे, राजेंद्र माने, डॉ. विनोद भेलोसे, स्वप्निल झांबरे, राहुल मोकाशी, राजेंद्र शिंदे आणि डॉ. माणिक गावडे यांचा समावेश होता. महासंघाच्या या उपक्रमाचे पोलीस प्रशासनाने स्वागत करत नागरिक आणि पोलीस यांच्यातील समन्वय अधिक दृढ होण्यास अशा कार्यक्रमांची मदत होत असल्याचे सांगितले. नागरिकांच्या सहकार्याने परिसरात अधिक सुरक्षित आणि सुसंवादी वातावरण निर्माण करण्याचा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने पोलीस दलाच्या कार्याला सलाम करणाऱ्या या उपक्रमाचे परिसरातील नागरिकांकडून विशेष कौतुक होत असून समाजातील ‘रिअल हिरोज’ना दिलेला हा मान सन्मान प्रेरणादायी ठरत आहे.

### स्वातंत्र्यदिनानिमित्त पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या शौर्याचा सन्मान

**पिंपरी : दैनिक संध्या**

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयातील अधिकारी व अंमलदारांच्या उत्कृष्ट व उल्लेखनीय सेवेला गौरव देत राष्ट्रपती पदक, अतिउत्कृष्ट सेवा पदक, उत्कृष्ट सेवा पदक तसेच विशेष सेवा पदके जाहीर करण्यात आली आहेत. यामध्ये एकूण ४४ पोलिस अधिकारी व अंमलदारांचा समावेश असून त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यात आला आहे. पोलिस आयुक्तालयातील पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे, अपर पोलिस आयुक्त संजय आवटे आणि पोलिस उपायुक्त श्रेया वेडकर यांच्यासह २९ अधिकारी व अंमलदारांना अतिउत्कृष्ट सेवा पदक प्रदान करण्यात आले आहे. तसेच १५ पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना विशेष सेवा पदक जाहीर झाले आहे. गुणवत्तापूर्ण व उल्लेखनीय सेवेसाठी पोलिस उपनिरीक्षक शिवानंद स्वामी यांना राष्ट्रपती पदक जाहीर करण्यात आले आहे. त्यांच्या दीर्घकालीन आणि निष्ठावंत सेवेला हा मानाचा पुरस्कार मिळाला आहे. उत्कृष्ट सेवा पदकासाठी पोलिस उपायुक्त श्रेया वेडकर, पोलिस निरीक्षक विनोद पाटील, सुहास आवाड, शिवशरण गावडे, संजय शिंदे, संतोष बिर्जे, आशीष ढाके यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचाऱ्यांची निवड करण्यात आली आहे. दरम्यान, उपराष्ट्रपतींकडून मिळालेल्या पोलिस शौर्य पदकांचे वितरणही नुकतेच करण्यात आले. पोलिस आयुक्तालयातील शिवनेरी हॉल येथे आयोजित समारंभात पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या हस्ते पदक प्राप्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

### “आजचा तरुण वैचारिक दृष्ट्या खूप परिपक्व आहे” : सुहास घुमरे

**पिंपरी : दैनिक संध्या**

आजचा तरूण हा वैचारिक दृष्ट्या खूप परिपक्व आहे. पण त्याने अती उत्साहात स्वतःचे स्वातंत्र्य उपभोगताना दुसऱ्याच्या स्वातंत्र्यावर अतिक्रमण होणार नाही याची दक्षता त्याने घ्यावी असे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष कवी गझलकार, साहित्यिक सुहास घुमरे यांनी व्यक्त केले. सुहास घुमरे यांनी विद्यार्थ्यांना प्रबोधन पर गोष्ट सांगून काव्य लिखाणासाठी प्रोत्साहन देऊन शुभेच्छा दिल्या. स्वयंसिद्धा प्रतिष्ठान, पिंपरी चिंचवड, पुणे यांच्या वतीने ८० व्या स्वातंत्र्यदिना निमित्ताने, स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला निमंत्रित कवी आणि विद्यार्थ्यांचे कवी संमेलन तसेच निबंध स्पर्धाचे आयोजन, ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय निगडी येथील गुरुकुल विभागात करण्यात आले. यावेळी शाळेतील विद्यार्थी कवींचा मोठा प्रतिसाद मिळाला. इयत्ता सातवी ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजन केलेल्या 'विविधतेतील एकता' या विषयावरील निबंध स्पर्धेत 126 स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. या निबंध स्पर्धेचे परीक्षक म्हणून निवृत्त शिक्षिका व साहित्यिका रजनीताई अहेरराव यांनी काम पाहिले. त्या आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या की, "निबंध वाचताना कुठे बालमनाची निरागसता जाणवली, कुठे विचारांची प्रगल्भता दिसली, तर कुठे कल्पनाशक्तीने मनाला सुखद धक्का दिला. काही विद्यार्थ्यांनी अगदी साध्या विषयाकडेही वेगळ्या दृष्टिकोनातून पाहिले होते. ‘विविधतेतून एकता’ या विषयावरील निबंधामधून तर आपल्या देशातील विविध भाषा, धर्म, संस्कृती, परंपरा आणि विचार यांच्यातील एकात्मतेची सुंदर जाणीव अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या शब्दांत व्यक्त केली आहे." प्रमुख पाहुणे साहित्यिक व पत्रकार श्री पितांबर लोहार हे आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, "भारतीय समाज व्यवस्था कुटुंबवत्सल आहे. यामध्ये आई-वडिलांच्या सेवेला देवता समान महत्त्व आहे. भारतीय संस्कृतीचा हा एक संस्कार आहे. साक्षात परमेश्वरालाही युगानुयुगे विटेवरी उभे करण्याची ताकद या संस्कारात आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे पंढरपूरचे भक्त पुंडलिक आणि कमरेवर हात ठेवून युगानुयुगे विटेवर उभा असलेला पांडुरंग होय."तसेच श्री. पितांबर लोहार यांनी 'साथ चल' ही हिंदी रचना सादर केली आणि भाऊ बहिणीवरील 'आई बघ ना' ही मराठी रचना सादर केली. या कार्यक्रमाला ज्येष्ठ साहित्यिका शोभाताई जोशी यांची विशेष उपस्थिती होती. या कार्यक्रमाच्या संयोजनात राजश्री मराठे मॅडम, श्रीराम दादा, गुरुकुल विभागाचे शिक्षक वर्ग, व विद्यार्थ्यांचे संयोजनात सहकार्य लाभले.



# पिंपरीत भाजपच्या वतीने भव्य ‘मूक मोर्चा’

**■ पिंपरी (दै. संध्या)**

भारताच्या फाळणी दरम्यान लाखो नागरिकांनी सोसलेल्या वेदना, विस्थापन आणि बलिदानाचे स्मरण करण्यासाठी पिंपरी-चिंचवड शहर भाजपच्या वतीने ‘विभाजन विभीषिका स्मृती दिन’ निमित्त भव्य मूक मोर्चाचे आयोजन करण्यात आले. भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या मोर्चातून फाळणीतील पीडित आणि निर्वासित सिंधी बांधवांप्रती आदर व एकात्मतेची भावना व्यक्त करण्यात आली.

डिलक्स चौक, पिंपरी येथून सुरू झालेला हा मूक मोर्चा शगुन चौक आणि साई चौक मार्गे पिंपरी कॅम्पमधील अडवाणी धर्मशाळा येथे पोहोचला. संपूर्ण मोर्चा शांतता, शिस्त आणि गंभीर वातावरणात पार पडला. फाळणीच्या जखमा आणि त्या काळातील मानवी वेदनांचे स्मरण करत उपस्थितांनी पीडितांना आदरांजली वाहिली.

यावेळी बोलताना शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे म्हणाले, “१४ ऑगस्ट १९४७ हा दिवस भारताच्या इतिहासातील अत्यंत वेदनादायी दिवस आहे. फाळणीच्या काळात लाखो लोकांनी आपली घरे, कुटुंबे आणि आयुष्य गमावले. निर्वासित बांधवांचा त्याग आणि संघर्ष कधीही विसरता येणार नाही. त्यांच्या स्मृती जपणे आणि हा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे हे आपले कर्तव्य आहे.”

भारतीय स्वातंत्र्य पर्वाचे अभ्यासक हेमदेवजी थापर यांनी फाळणीमागील राजकीय परिस्थिती, त्याचे दूरगामी परिणाम आणि त्या काळात समाजाने केलेल्या मदतकार्याचा आढावा घेतला. इतिहासातील अशा दुःखद घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सत्य जाणून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.




या मूक मोर्चात आमदार महेश लांडगे, आमदार अमित गोरखे, माजी आमदार अश्विनी जगताप, संगठन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, सरचिटणीस मधुकर बच्चे, वैशाली खाडये, विकास डोळस, सदाशिव खाडे, वरिष्ठ उपाध्यक्ष संजय पटणी, ॲड. नानिक पंजाबी यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, महिला आघाडी, युवा मोर्चाचे कार्यकर्ते, सिंधी समाजातील ज्येष्ठ नागरिक, व्यापारी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

फाळणीतील पीडितांच्या स्मृतींना अभिवादन करत इतिहासातील वेदनादायी घटनांचे स्मरण आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारा हा मूक मोर्चा पिंपरीत भावपूर्ण वातावरणात पार पडला.

## प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करण्याचे बावनकुळे यांचे आश्वासन

**■ पिंपरी (दै. संध्या)**

ताथवडे गावठाण परिसरातील प्रलंबित सिटी सर्व्हेचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, अशी मागणी नगरसेवक राहुल कलाटे यांनी राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली आहे. पुण्यात झालेल्या भेटीत त्यांनी निवेदन सादर करत ताथवडे गावठाणातील नागरिकांना सिटी सर्व्हेअभावी भेडसावणाऱ्या विविध अडचणींकडे लक्ष वेधले. याची गंभीर दखल घेत महसूलमंत्री बावनकुळे यांनी सिटी सर्व्हेची प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे.

ताथवडे गावठाण परिसराचा सिटी सर्व्हे अद्याप पूर्ण झालेला नसल्याने मालमत्तेची मोजणी, बांधकाम परवानगी तसेच इतर आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करताना नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. मौजे ताथवडे, ता. मुळशी, जि. पुणे येथील गावठाणाचा सिटी सर्व्हे व्हावा यासाठी राहुल कलाटे यांनी सन २०२० पासून सातत्याने पाठपुरावा केला असून संबंधित विभागाकडे वेळोवेळी पत्रव्यवहारही केला आहे. मात्र, अद्याप या प्रश्नावर ठोस कार्यवाही झालेली नाही. सध्या ताथवडे परिसराचा समावेश पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीत झाला असला तरी सिटी सर्व्हे नसल्यामुळे मालमत्ताधारकांना त्यांच्या जागांबाबत आवश्यक कायदेशीर बाबी पूर्ण करता येत नाहीत. परिणामी परिसराच्या नियोजित विकासाला अडथळा निर्माण होत असून नागरिकांना विविध प्रशासकीय अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

## ‘पीएमआरडीए’मध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात

**■ पिंपरी (दै. संध्या)**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) आकुर्डी येथील मुख्यालयात देशाचा ८० वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. महानगर आयुक्त डॉ. अभिजित चौधरी (भा.प्र.से.) यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी महिलांची सुरक्षा व सन्मान यासाठी उपस्थितांना ‘पॉश’ कायद्याबाबत जागृतीची महत्त्वपूर्ण शपथ देण्यात आली.

या सोहळ्याप्रसंगी अतिरिक्त महानगर आयुक्त के. मंजुलक्ष्मी (भा.प्र.से.), डॉ. अनुश्री चौधरी आणि ‘पीएमआरडीए’ दक्षता विभागाचे पोलीस अधीक्षक अमोल झेंडे (भा.पो.से.) यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात ‘वंदे मातरम्’, राष्ट्रगीत आणि महाराष्ट्राच्या राज्यगीताने झाली. दक्षता विभागाचे पोलीस निरीक्षक नंदकुमार बिडवई यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक पवन पाटील, त्यांचे पथक आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी राष्ट्रध्वजाला शिस्तबद्ध मानवंदना दिली. स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून ‘पीएमआरडीए’च्या महिला कर्मचाऱ्यांनी काढलेली आकर्षक रांगोळी उपस्थितांच्या आकर्षणाचे केंद्र ठरली. यंदाच्या स्वातंत्र्यदिनी केवळ ध्वजारोहण न करता सामाजिक भान जपत महिला सुरक्षा व सन्मान, तसेच ‘पॉश’ कायद्याबाबत जागृतीची शपथ देण्यात आली.





## महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते ध्वजारोहण

**■ पिंपरी (दै. संध्या)**

“स्वातंत्र्य म्हणजे केवळ आपल्याला मिळालेला अधिकार नसून राष्ट्र आणि समाजाप्रती असलेली मोठी जबाबदारीदेखील आहे. पिंपरी-चिंचवड शहराचा विकास करताना प्रत्येक नागरिकाला दर्जेदार मूलभूत सुविधा, पारदर्शक प्रशासन आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सुलभ सेवा उपलब्ध करून देणे ही आमची प्राथमिकता आहे. स्वातंत्र्याची मूल्ये जपत लोककल्याण, पर्यावरण संवर्धन, महिला सन्मान आणि सर्वसमावेशक विकासाचा ध्यास घेऊन पिंपरी-चिंचवडला देशातील आदर्श शहर बनविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.



भारताच्या ८०व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते उत्साहपूर्ण आणि देशभक्तिमय वातावरणात ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत स्वातंत्र्यसैनिक, क्रांतिकारक आणि राष्ट्रनिर्मितीसाठी योगदान देणाऱ्या सर्व ज्ञात-अज्ञात वीरांच्या बलीदान,समर्पण व त्यागाचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करताना महापौर लांडगे हे बोलत होते.

या सोहळ्यास आमदार उमा खापरे, उपमहापौर शर्मिला बाबर,आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, स्थायी समिती अध्यक्ष अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, माजी महापौर योगेश बहल, कला, क्रीडा व सांस्कृतिक समितीचे सभापती कैलास कुटे, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, ‘ल’ प्रभाग अध्यक्ष रेखा देवकर, नगरसदस्य मधुरा शिंदे, वर्षा जगताप, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, मुख्य लेखा परिक्षक प्रमोद भोसले,मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे,सह आयुक्त मनोज लोणकर,आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.लक्ष्मण गोफणे,उप आयुक्त डॉ.प्रदीप ठेंगल,अण्णा बोदडे, वेंकटेश दुर्वास,ममता शिंदे,चेतना केरूरे,सह शहर अभियंता मनोज सेठीया,अजय सुर्यवंशी,प्रेरणा सिनकर यांच्यासह महानगरपालिकेचे विविध विभागप्रमुख, अग्निशमन, आपत्ती व्यवस्थापन तसेच सुरक्षा अधिकारी, पिंपरी चिंचवड कर्मचारी महासंघाचे पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## सुशिक्षित तरुणाने चोरल्या तब्बल २२ दुचाकी

**■ पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या गुन्हे शाखा युनिट १ ने मोटारसायकल चोरी करणाऱ्या एका सुशिक्षित तरुणाला अटक करून तब्बल २२ मोटारसायकली जप्त केल्या आहेत. या कारवाईमुळे पिंपरी-चिंचवड, पुणे शहर आणि पुणे ग्रामीण परिसरातील २२ चोरीच्या गुन्ह्यांचा उलगडा झाला असून सुमारे १२ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सचिन पांडुरंग मरळे (वय ३३ वर्ष सध्या रा. ढोरे पाटील फार्म, भावसार यांचे घरात भाडेकरु, जुनी सांगवी) याला पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कमी वेळात जास्त पैसे कमावण्याच्या उद्देशाने सुशिक्षित तरुणाने विविध भागांतून मोटारसायकली चोरी करून त्या कमी किमतीत विक्री केल्या. गुन्हे शाखा युनिट १ चे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रामेश्वर मोताळे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने घटनास्थळांवरील २५० ते ३०० सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करून आरोपीचा माग काढला. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी सचिन पांडुरंग मरळे (वय ३३) याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने पिंपरी-चिंचवड, पुणे शहर आणि पुणे ग्रामीण हद्दीतील मोटारसायकल चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. आरोपीने चोरीच्या दुचाकी सांगोला, अहमदनगर, शिरूर, बीड आणि रायगड जिल्ह्यातील विविध व्यक्तींना विकल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या कारवाईत पिंपरी, हिंजवडी, चतु:श्रृंगी, सांगवी, दापोडी, संत तुकारामनगर, भोसरी आणि शिरूर पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या एकूण २२ गुन्ह्यांचा उलगडा करण्यात आला आहे.

# ताथवडेतील ५० एकर जमीन अखेर पोलिस मुख्यालयाच्या ताब्यात

**■ पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या स्थापनेनंतर तब्बल आठ वर्षांनी पोलिसांना स्वतंत्र आणि हक्काची जागा मिळाली आहे. ताथवडे येथील पशुसंवर्धन विभागाच्या वळुमाता प्रक्षेत्रातील २० हेक्टर अर्थात ५० एकर जमीन पोलिस मुख्यालयासाठी पोलिस प्रशासनाच्या ताब्यात देण्यात आली आहे. त्यामुळे स्वतंत्र मुख्यालय, परेड मैदान, प्रशिक्षण तसेच अधिकारी-अंमलदारांसाठी विविध सुविधांनी सुसज्ज अत्याधुनिक पोलिस संकुल उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. विशेष म्हणजे, आयुक्तालयाच्या आठव्या वर्धापनदिनाच्या पूर्वसंध्येलाच हा आठ वर्षांपासून प्रलंबित प्रश्न मार्गी लागला आहे.




### चार नवीन पोलिस ठाणी; मनुष्यबळात भर..

शहराच्या वाढत्या विस्ताराच्या पार्श्वभूमीवर संत तुकारामनगर, दापोडी, काळेवाडी आणि बावधन अशी चार नवीन पोलिस ठाणी सुरू करण्यात आली. त्याचबरोबर अतिरिक्त वरिष्ठ अधिकारी, पोलिस उपायुक्त, सहायक पोलिस आयुक्त आणि विविध संवर्गातील शेकडो नवीन पदांना मंजुरी मिळाली.

### सायबरपासून फॉरेन्सिकपर्यंत बदल..

बदलत्या गुन्हेगारीला सामोरे जाण्यासाठी स्वतंत्र सायबर पोलिस ठाणे, बॉम्बशोधक व नाशक पथक, अमलीपदार्थ शोध श्वान पथक, सोशल मीडिया लॅब, मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन आणि पोलिस रुग्णालय सुरू करण्यात आले. डिजिटल तपास आणि तांत्रिक पुराव्यांच्या वापरावरही भर देण्यात आला. दरम्यान, पोलिसांच्या वाहन ताफ्यातही मोठी भर पडली असून, १५७ जीप, १५ बस, एक ट्रक, एक टँकर, १७ टेम्पो ट्रॅव्हलर आणि १७२ दुचाकी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

२८ मे २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाची स्थापना झाली. १५ ऑगस्ट २०१८ पासून प्रत्यक्ष कामकाज सुरू झाले. मात्र, स्वतंत्र जागेअभावी निगडीतील महापालिकेच्या बो-हाडे शाळेच्या जागेत भाडेतत्त्वावर पोलिस मुख्यालय सुरू करण्यात आले. कालांतराने नवीन पोलिस ठाणी, विशेष शाखा आणि मनुष्यबळ वाढल्याने अपुऱ्या जागेमुळे प्रशासकीय कामकाज, प्रशिक्षण, परेड आणि वाहन व्यवस्थापनावर मर्यादा येत होत्या.

पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर स्वतंत्र मुख्यालयाचा प्रश्न प्राधान्याने हाती घेतला. ताथवडे येथील जागा प्रशासकीय आणि दळणवळणाच्या दृष्टीने योग्य असल्याने शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. महसूल व वन विभागाच्या मंजुरीनंतर पुणे जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने १३ ऑगस्ट रोजी ५० एकर जमीन पोलिस प्रशासनाच्या ताब्यात देण्यात आली. या प्रक्रियेसाठी पोलिस आयुक्त चौबे, पोलिस सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलिस आयुक्त सारंग आवाड, डॉ. बसवराज तेली यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपायुक्त गणेश इंगळे आणि पोलिस निरीक्षक विकास राऊत यांनी पाठपुरावा केला.

ताथवडेतील जागेत पोलिस उपायुक्त (मुख्यालय) कार्यालय, शस्त्रागार, क्यूआरटी, बॉम्बशोधक व नाशक पथक २(बीडीडीएस), मोटार परिवहन विभाग, परेड ग्राऊंड, पोलिस भरती मैदान, रनिंग ट्रॅक, क्रीडांगणे, इंटरनल शूटिंग रेंज आणि श्वान पथक उभारण्याचे नियोजन आहे. तसेच पोलिस दवाखाना, पाल्यांसाठी शाळा, बहुद्देशीय सभागृह आणि अधिकारी अंमलदारांसाठी निवास व्यवस्था उभारण्यात येणार आहे.

# कमरेला पिस्तूल, साथीदारांकडे घातक हत्यारे; पोलिसांचा अचूक सापळा!

## सराईत आरोपी गावठी पिस्तूल व जिवंत काडतुसांसह जेरबंद; तीन साथीदार फरार : शस्त्र कुणासाठी आणि कशासाठी? प्रत्येक धाग्याचा पोलिसांकडून सखोल तपास

### तीन वर्षांत गोपनीय माहितीच्या आधारे सहा अग्निशस्त्रे हस्तगत; बारामती शहर पोलिसांचे मजबूत 'इंटेलिजन्स नेटवर्क' पुन्हा अधोरेखित

■ बारामती (दै. संध्या)



बारामती शहर व परिसरात बेकायदेशीर अग्निशस्त्रे व घातक हत्यारे बाळगून फिरणाऱ्या तसेच संभाव्य गंभीर गुन्ह्यांच्या अनुषंगाने संशयास्पद हालचाली करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध बारामती शहर पोलीस स्टेशनकडून सातत्याने कठोर व प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे. त्याच मोहिमेअंतर्गत मिळालेल्या खात्रीशीर गोपनीय माहितीवर तातडीने हालचाल करून अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने सापळा रचत प्रदीप सुरेश नकाते, वय 27 वर्षे, रा. महात्मा फुलेनगर, आमराई, बारामती, ता. बारामती, जि. पुणे यास देशी बनावटीच्या गावठी पिस्तूल व दोन जिवंत काडतुसांसह शिताफीने ताब्यात घेण्यात बारामती शहर पोलिसांना यश आले आहे.

सदर कारवाईच्या अनुषंगाने बारामती शहर पोलीस स्टेशन गु.र.नं. 322/2026, शस्त्र अधिनियम, 1959 चे कलम 3 व 25 अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून, हस्तगत अग्निशस्त्र व जिवंत काडतुसांबाबत आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे.

दिनांक 09/08/2026 रोजी बारामती शहर पोलीस स्टेशनच्या तपास पथकातील पोलीस शिपाई अक्षय सिताफ यांना त्यांच्या गोपनीय बातमीदारामार्फत महत्त्वपूर्ण व खात्रीशीर माहिती प्राप्त झाली की, प्रदीप सुरेश नकाते हा कमरेला पिस्तूल खोचून इतर काही इसमांसोबत फिरत असून, त्याच्यासोबत असलेल्या इसमांकडे कोयत्यासारखी घातक हत्यारे आहेत. एकाच वेळी अनेक शस्त्रधारी इसम एकत्रित फिरत असल्याची माहिती गंभीर स्वरूपाची असल्याने एखादी अनुचित अथवा गंभीर घटना घडण्यापूर्वीच संभाव्य धोका निष्प्रभ करण्याच्या दृष्टीने पोलिसांनी सदर माहितीची तातडीने दखल घेतली.

तपास पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. शशिकांत इंगवले यांनी प्राप्त गोपनीय माहितीचा आशय तत्काळ प्रभारी पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांना कळविला. त्यानंतर सदर माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. चैतन्य कदम तसेच अपर पोलीस अधीक्षक श्री. गणेश बिरादार यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शन व निर्देशानुसार माहितीची खातरजमा करून, योग्य खबरदारी घेत संशयितांना कोणतीही चाहूल लागू न देता सापळा रचून कारवाई करण्याचे नियोजन करण्यात आले. त्यानुसार तपास पथकाने गोपनीय पद्धतीने परिसराची पाहणी करून संशयितांच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवले. योग्य संधी साधत नियोजनबद्धरीत्या सापळा रचून प्रदीप सुरेश नकाते यास शिताफीने ताब्यात घेण्यात आले. कायदेशीर प्रक्रिया अनुसरून त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या कमरेला खोचलेले काळसर रंगाचे देशी बनावटीचे गावठी पिस्तूल मिळून आले. सदर पिस्तुलाची मॅगझीन तपासली असता त्यामध्ये दोन जिवंत काडतुसे मिळून आली. जप्त गावठी पिस्तुलाची अंदाजे किंमत रु. 25,000/- व दोन जिवंत काडतुसांची अंदाजे किंमत रु. 400/-, असा एकूण रु. 25,400/- किमतीचा मुद्देमाल कायदेशीर पंचनाम्याने हस्तगत करण्यात आला.

कारवाईची चाहूल लागताच प्रदीप नकाते याच्यासोबत असलेले इतर इसम घटनास्थळावरून पसार झाल्याची बाब पुढील तपासात समोर आली. ताब्यातील आरोपीकडे करण्यात आलेल्या तपासात तसेच उपलब्ध माहितीच्या आधारे सन 2026 मधील सदर शस्त्र प्रकरणाच्या अनुषंगाने अजय नंदकुमार सकट, रा. आमराई, ता. बारामती, जि. पुणे; रोहीत अशोक सोनवणे, रा. आमराई, ता. बारामती; तसेच गणेश पाठक, रा. आमराई, ता. बारामती, जि. पुणे या तीन संशयितांची नावे निष्पन्न झाली आहेत.

सदर तिघे सध्या फरार असून त्यांचा शोध घेण्यासाठी बारामती शहर पोलीस स्टेशनची तपास पथके सक्रिय करण्यात आली आहेत. सदर प्रकरणातील त्यांचा नेमका सहभाग, घटनास्थळी त्यांची उपस्थिती, त्यांच्याकडे कोणती हत्यारे होती, प्रदीप नकाते याच्यासोबत एकत्रित फिरण्यामागील उद्देश काय होता तसेच कोणत्याही गंभीर गुन्ह्याचे पूर्वनियोजन करण्यात आले होते का, याबाबत सखोल तपास सुरू आहे. संबंधित संशयितांच्या भूमिकेबाबत अंतिम निष्कर्ष तपासात प्राप्त होणाऱ्या कायदेशीर पुराव्यांच्या आधारे निश्चित करण्यात येणार आहे.

विशेष बाब म्हणजे, प्रदीप नकाते याच्याविरुद्ध यापूर्वीही गुन्हे दाखल असून त्याची गुन्हेगारी पार्श्वभूमी तपासात विचारात घेण्यात येत आहे. दिनांक 28/11/2025 रोजीदेखील त्याच्याकडून बेकायदेशीर गावठी पिस्तूल व चार जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात आली होती. त्या वेळी बारामती शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. 439/2025 नोंद करून शस्त्र अधिनियमाचे कलम 3 व 25 तसेच संबंधित कायदेशीर तरतुदींनुसार कारवाई करण्यात आली होती. त्या कारवाईमध्ये सुमारे रु. 25,800/- किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला होता.

एकाच आरोपीकडून पुन्हा बेकायदेशीर अग्निशस्त्र मिळून आल्याची बाब गंभीर स्वरूपाची असून, त्यामुळे सदर प्रकरणाच्या तपासाची व्याप्ती वाढविण्यात आली आहे. हा प्रकार केवळ एका व्यक्तीने बेकायदेशीर पिस्तूल बाळगण्यापुरता मर्यादित आहे की त्यामागे व्यापक शस्त्रपुरवठा साखळी, अन्य गुन्हेगार किंवा संभाव्य गंभीर गुन्ह्याचे नियोजन आहे, याचा तपास बारकाईने करण्यात येत आहे.

या कारवाईतील विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे पोलीस शिपाई अक्षय सिताफ यांचे सातत्यपूर्ण गोपनीय माहिती संकलन आणि त्या माहितीचे यशस्वी शस्त्रविरोधी कारवायांमध्ये झालेले रूपांतर. बारामती शहर पोलीस स्टेशन येथे कर्तव्यावर हजर झाल्यापासून सन 2024, 2025 व 2026 या तीन वर्षांच्या कालावधीत गोपनीय बातमीदारांच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे सापळे रचून एकूण सहा अग्निशस्त्रे हस्तगत करण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

गुन्हेगारी हालचालींबाबत वेळेत माहिती मिळणे हे प्रतिबंधात्मक पोलिसिंगचे अत्यंत महत्त्वाचे शस्त्र आहे. त्यासाठी स्थानिक पातळीवरील विश्वास, सातत्यपूर्ण संपर्क, माहितीची गोपनीयता आणि बातमीची अचूक पडताळणी यांचा समन्वय आवश्यक असतो. पोलीस शिपाई अक्षय सिताफ यांनी पोलीस स्टेशन हद्दीत उभे केलेले विश्वासार्ह गोपनीय बातमीदारांचे जाळे आणि त्यातून मागील तीन वर्षांत सहा अग्निशस्त्रे हस्तगत होण्यास मिळालेली मदत हे प्रभावी स्थानिक इंटेलिजन्सचे ठोस उदाहरण ठरले आहे. सन 2025 मध्ये प्रदीप नकाते याच्याकडून अग्निशस्त्र हस्तगत करण्यात आलेल्या कारवाईच्या वेळीही त्यांना गोपनीय बातमीदारामार्फत महत्त्वपूर्ण माहिती प्राप्त झाली होती. सन 2026 मध्ये पुन्हा त्याच आरोपीबाबत मिळालेली अचूक माहिती आणि त्यानंतर झालेली यशस्वी कारवाई यामुळे या स्थानिक माहिती-जाळ्याची परिणामकारकता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. आरोपी प्रदीप नकाते याने सदर गावठी पिस्तूल कोठून, कोणाकडून व केव्हा मिळविले, शस्त्र पुरविणारी व्यक्ती अथवा साखळी कोणती आहे, त्यासाठी आर्थिक व्यवहार झाला आहे का, आरोपीने हे पिस्तूल कोणत्या व्यक्तीविरुद्ध हल्ला करण्यासाठी किंवा अन्य गंभीर गुन्हा करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगले होते का, फरार संशयितांची भूमिका काय आहे तसेच या संपूर्ण प्रकरणामध्ये आणखी कोणाचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष सहभाग आहे का, या प्रत्येक बाबीचा स्वतंत्रपणे व सखोल तपास करण्यात येत आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार ज्ञानदेव विष्णू क्षीरसागर हे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत. आरोपीची पूर्व गुन्हेगारी पार्श्वभूमी, त्याच्याकडून वारंवार अग्निशस्त्रे मिळून येत असल्याची बाब, त्याच्या संपर्कातील व्यक्ती, फरार संशयितांची भूमिका, संभाव्य शस्त्रपुरवठादार आणि शस्त्रे उपलब्ध करून देणारी संभाव्य साखळी या सर्व बाबी लक्षात घेऊन तपासाची व्याप्ती वाढविण्यात आली आहे. सद्य तपासात प्राप्त होत असलेल्या माहितीच्या अनुषंगाने या प्रकरणातून आणखी अग्निशस्त्रे अथवा घातक हत्यारे हस्तगत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आरोपी व त्याच्या साथीदारांना शस्त्रे कोठून व कोणामार्फत उपलब्ध झाली, शस्त्रपुरवठ्यामागे आणखी कोणती व्यक्ती अथवा साखळी कार्यरत आहे का, यापूर्वी इतर व्यक्तींना अशाच प्रकारे शस्त्रे पुरविण्यात आली आहेत का तसेच सदर शस्त्रांचा कोणत्याही गंभीर गुन्ह्यासाठी वापर करण्याचे नियोजन होते का, याचा अत्यंत बारकाईने तपास करण्यात येत आहे.

तपासाचा प्रत्येक धागा शस्त्राच्या मूळ स्रोतापर्यंत नेण्यावर बारामती शहर पोलिसांचा भर असून, पुढील तपासातून आणखी महत्त्वपूर्ण बाबी निष्पन्न होण्याची तसेच अतिरिक्त अग्निशस्त्रे हस्तगत होण्याची शक्यता आहे. तपासामध्ये ज्या-ज्या व्यक्तींचा सहभाग कायदेशीर पुराव्यांतून निष्पन्न होईल, त्यांच्या भूमिकेनुसार त्यांच्याविरुद्ध कायद्यान्वये कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. संदीप सिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक श्री. गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. चैतन्य कदम व प्रभारी पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

त्यांच्या मार्गदर्शनानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. शशिकांत इंगवले व पोलीस उपनिरीक्षक श्री. अजित पाटील यांच्या नेतृत्वाखाली तपास पथकातील पोलीस शिपाई अक्षय सिताफ, पोलीस हवालदार ज्ञानदेव क्षीरसागर, पोलीस हवालदार यशवंत पवार, पोलीस शिपाई गिरीश नेवसे, पोलीस शिपाई सागर जामदार, पोलीस शिपाई विशाल शिंदे, पोलीस शिपाई कवितके, पोलीस शिपाई विजय ओंबासे व पोलीस शिपाई विशाल चौधरी यांनी प्राप्त गोपनीय माहितीची पडताळणी, संशयितांच्या हालचालींवर निगराणी, सापळ्याचे नियोजन आणि प्रत्यक्ष कारवाईमध्ये समन्वय साधून सदर कारवाई यशस्वी केली. अचूक गोपनीय माहिती, मजबूत स्थानिक इंटेलिजन्स नेटवर्क, वरिष्ठ अधिकाऱ्यांचे तातडीचे मार्गदर्शन आणि तपास पथकाची प्रत्यक्ष कारवाईतील शिताफी यांचा प्रभावी संगम या कारवाईत दिसून आला. संभाव्य गंभीर घटना घडण्यापूर्वीच शस्त्रधारी आरोपी ताब्यात घेऊन त्याच्याकडील अग्निशस्त्र व जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात आली, तर तपासाचा विस्तार करून अन्य संशयितांची नावे निष्पन्न करण्यात आली आणि त्यांच्या शोधासाठी स्वतंत्र प्रयत्न सुरू करण्यात आले. गुन्हा घडल्यानंतर त्याचा छडा लावणे हे पोलिसांचे कर्तव्य आहेच; परंतु विश्वसनीय गोपनीय माहितीच्या आधारे संभाव्य गुन्हा घडण्यापूर्वीच धोका ओळखून त्यावर कायदेशीर कारवाई करणे हे प्रभावी पोलिसिंगचे खरे सामर्थ्य आहे. बारामती शहर पोलिसांची सदर कारवाई माहितीआधारित, सतर्क आणि प्रतिबंधात्मक पोलिसिंगचे ठोस उदाहरण ठरली आहे.

> बारामती शहर व परिसरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे, बेकायदेशीर अग्निशस्त्रांचा वापर रोखणे तसेच गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी बारामती शहर पोलीस स्टेशनकडून अशा कारवाया यापुढेही सातत्याने व कठोरपणे करण्यात येणार आहेत. नागरिकांना बेकायदेशीर अग्निशस्त्रे, कोयते किंवा अन्य घातक हत्यारे बाळगणाऱ्या व्यक्ती, संशयास्पद हालचाली अथवा संभाव्य गुन्हेगारी कृत्यांबाबत विश्वसनीय माहिती असल्यास ती तात्काळ बारामती शहर पोलिसांना देण्याचे आवाहन करण्यात येत आहे. माहिती देणाऱ्या नागरिकाचे नाव व ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येईल.

## थोडक्यात पण महत्वाचे



### स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

■ साधिका बहुउद्देशीय सेवाभावी संस्था हनुमाननगर यांचा सामाजिक उपक्रम

बारामती : दैनिक संध्या

स्व.अजित दादा पवार यांच्या स्मरणार्थ साधिका बहुउद्देशीय सेवाभावी संस्था हनुमाननगर-बारामती यांच्यावतीने महिलांसाठी मोफत भव्य आरोग्य शिबिर संपन्न झाले.अजितदादांच्या वाढदिवसानिमित्त महिलांसाठी भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिर मागील चार वर्षांपासून राबविले जात आहे.यामध्ये महालॅब,डॉ.सुनिल पवार, डॉ.मनोज खोमने,डॉ.महेश जगताप,डॉ.नाझीकर,आहार तज्ञ प्रियंका जराड यांचे विशेष सहकार्य लाभले.कुटुंबाची काळजी घेणारी घरातील भगिनी ही निरोगी असावी, स्वतःहा विषयी जागृत असावी,कुटुंबाबरोबर स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी,स्त्री ही घराचा पाया असते हाच पाया खचला तर पूर्ण घर कोसळते.म्हणून आपल्या परिसरातील सर्व माता-भगिनींच्या आरोग्याची काळजी साधिका बहुउद्देशीय संस्थेच्या पदाधिकारी घेत आहेत.यात थायरॉईड,शुगर, हिमोग्लोबिन,बीपी,कॉलेस्ट्रॉल यांची तपासणी करण्यात आली.महिलांसाठी पौष्टिक अल्प उपहाराची सोय छान प्रकारे केली होती.हिमोग्लोबिन तपासणीवेळी ज्यांचे कमी आहे त्यांना पुढील तीन महिने रक्त वाढीच्या गोळ्या घरपोच नेहुन देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.पौष्टिक आहार कुटुंबाबरोबर स्वतःही सेवन केला पाहिजे ही माहिती महिलांना शिबिरात सांगितली. कार्यक्रमाचे उद्घाटन बारामती नगरपालिकेचे नगराध्यक्ष सचिन शेठ सातव, मा.नगरसेविका डॉ.सुहासिनी सातव,बारामती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष किरण इंगळे, नगरसेवक राजेंद्र सोनवणे, नगरसेविका अश्विनी सातव यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळीमा.नगरसेवक सुरज सातव,सामाजिक कार्यकर्ते प्रकाश सातव,साधिका संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा अर्चना सातव,उपाध्यक्षा हर्षदा सातव,माधवी शेंडगे,नीता आवाडे, कविता खाडे,विद्या जाधव,सुप्रिया सुर्यवंशी,नंदा जगताप,शितल यादव,अर्चना पवार,नीता बारवकर,पुजा महामुनी,करिष्मा आवाडे उपस्थित होते.आरोग्य तपासणी साठी हनुमान नगर,माळेगाव कॉलनी ,लक्ष्मी नगर परिसरातील सर्व महिला भगिनींनी उपस्थित राहून आरोग्य तपासणी करून घेतली.

### श्री सिद्धेश्वर हायस्कूलमध्ये ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

कोऱ्हाळे बु : दैनिक संध्या



15 ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त श्री सिद्धेश्वर हायस्कूल को-हाळे बु याठिकाणी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी वेगवेगळे कार्यक्रम सादर केले.या प्रसंगी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सतिश मामा खोमणे, देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष घनश्याम पेशवे,सरपंच जगदाळे आप्पा,शरद खोमणे,सागर जगताप,राजेश वाघ,राहुल मिसाळ उपस्थित होते.साळवे मॅडम यांनी सुत्र संचालन करत त्यांनी या देशात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य आणि संविधान यांच्या बद्दल माहिती दिली.प्रसन्नता मिसाळ व अंजली जगताप या विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली.तसेच मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण व गणवेश वाटप करण्यात आले.मुख्याध्यापक श्री.भिंगारदिवे सर,श्री.वाघमारे सर व सर्व स्टाफ यांनी या कार्यक्रमासाठी मोलाचे योगदान दिले.

## उप विभागीय अधिकारी उत्तम दिघे यांच्या हस्ते ध्वजारोहण

■ बारामती (दै. संध्या)




भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त उप विभागीय अधिकारी उत्तम दिघे यांच्या हस्ते प्रशासकीय भवन येथे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष सचिन सातव, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिराजदार, उपविभागीय पोलीस अधिकारी चेतन्य कदम, तहसीलदार स्वप्नील रावडे, गट विकास अधिकारी किशोर माने, नगर परिषदेचे मुख्याधिकारी पंकज भुसे, तालुका कृषी अधिकारी सचिन हाके, उपअधीक्षक भुमीअभिलेख संजय घोंगडे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी, स्वातंत्र्य सैनिकांचे कुटुंबीय, नगरसेवक, पत्रकार, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या विद्यार्थांनी राष्ट्रगीत व राज्यगीत सादर केले. श्री. दिघे यांनी पोलीस पथकाची मानवंदना स्वीकारुन सर्व उपस्थित मान्यवरांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

## पत्रकार संघ बारामती २०२६-२८ ची कार्यकारिणी जाहीर

■ अध्यक्षपदी नवनाथ बोरकर, उपाध्यक्षपदी सागर सस्ते व शिवाजी ताटे तर सचिव पदी निलेश जाधव यांची बिनविरोध निवड

■ बारामती (दै. संध्या)



पत्रकार संघ बारामती या संघटनेची वार्षिक सर्वसाधारण बैठक शुक्रवार (दि.14) ऑगस्ट रोजी ज्येष्ठ नागरिक संघ बारामती येथे संपन्न झाली. या बैठकीत नवीन कार्यकारणी सर्वानुमते घोषित करण्यात आली.

या बैठकीत 2026 ते 2028 या कार्यकालासाठी पुढील प्रमाणे कार्यकारणी सर्वानुमते घोषित करण्यात आली.अध्यक्ष नवनाथ बोरकर,उपाध्यक्ष सागर सस्ते, शिवाजी ताटे,सचिव निलेश जाधव,सहसचिव सुरज देवकाते, कार्याध्यक्ष सौ.शुभांगी महाडिक, खजिनदार स्वप्निल शिंदे,सह खजिनदार प्रशांत कुचेकर यांची एक मताने बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी सुधीर जन्नू डॉ. विजयकुमार भिसे,सोमनाथ कवडे, तैनूर शेख,दीपक पडकर,दत्तात्रय महाडिक,राजेश वाघ,मन्सूर शेख, संजय भिसे, संतराम घुमटकर, मल्लिकार्जुन हिरेमठ, कृष्णमुर्ती जगताप हे कार्यकारणी सदस्य उपस्थित होते. पत्रकार संघ बारामती हा नावाजलेला आणि पत्रकारांच्या समस्या अडचणी सोडवणारा पत्रकारांचा संघ म्हणून परिचित आहे. या पत्रकार संघाची वाटचाल यशस्वीरित्या पुढे अविरतपणे चालवण्यासाठी आणि संघ महाराष्ट्रत नावारूपाला आणण्यासाठी मी प्रामाणिकपणे काम करून पत्रकारांच्या अडी अडचणी सोडवण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहील असे आश्वासन नवनिर्वाचित अध्यक्ष नवनाथ बोरकर यांनी यावेळी दिले.

### स्वातंत्र्यदिनी शाळेसाठी फरशी तर वसतिगृहासाठी जीवनावश्यक वस्तूंची

## हेल्पिंग अँड फाउंडेशनच्यावतीने मदत




■ सासवड (दै. संध्या)

हेल्पिंग अँड फाउंडेशन सासवड यांच्या वतीने अंबऋषी वाडी सोनोरी येथील शाळेसाठी फरशी बसून देण्यात आली स्वातंत्र्यदिनी या कामाची पूर्तता करून शालेय विद्यार्थ्यांसाठी एक आवश्यक गरजेची सुविधा फाउंडेशनच्या वतीने करून देण्यात आली. शिंदवणे तालुका हवेली येथील छत्रपती संभाजी महाराज निवासी कुस्ती संकुलास जीवनावश्यक वस्तूंची मदत करण्यात आली. ३० किलो गहू, २५ किलो तांदूळ, १५ लिटर तेल डब्बा, पाच किलो मूग डाळ, पाच किलो मसूर डाळ, पाच किलो शेंगदाणे याप्रमाणे वस्तीगृहासाठी जीवनावश्यक वस्तूंची मदत हेल्पिंग अँड फाउंडेशनच्या वतीने कुस्ती संकुलाचे प्रमुख पैलवान शरद महाडिक यांच्याकडे सुपूर्त करण्यात आली. ग्रामीण भागातील एकल पालक असणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी व कुस्ती प्रशिक्षणासाठी या संकुलाच्या माध्यमातून मदत करण्यात येते तसेच अशा गरीब विद्यार्थ्यांची निवासी सोय संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे अशी माहिती डॉक्टर कविता लडकत यांनी दिली. हेल्पिंग हँड फाउंडेशनचे अध्यक्ष सचिन पवार यांनी फाउंडेशनच्या माध्यमातून गरजू संस्थांना दरवर्षी प्रजासत्ताक दिन व स्वातंत्र्यदिनी वस्तू रुपात मदत करण्यात येते अशी माहिती दिली. सलग तेरा वर्ष हा उपक्रम सुरू असून बस प्रवासाच्या माध्यमातून सुरू झालेला मैत्रीचा प्रवास एका समाजपयोगी संस्थेच्या निर्मितीस हातभार लावणारा ठरला, प्रतिवर्षी जवळपास दोन लाख रुपये पेक्षा जास्त मदत हेल्पिंग हॅन्ड फाउंडेशनच्या माध्यमातून गरजू संस्थांना दिली जाते अशी माहिती सचिन पवार यांनी यावेळी दिली. या प्रसंगी फाउंडेशनचे विजय जगताप, मंगेश टिळेकर, संतोष गायकवाड, संदीप खराडे, उमेश ढाकणे, रामदास गिरमे, अँड. अमोल जगताप, तानाजी सातव, विजयराव भोसले, लक्ष्मीकांत वाघ, दत्ता मोरे आदी मान्यवर उपस्थित होते

## मुर्डेश्वर महिला ग्राम संघाची मासिक सभा संपन्न





■ मुढाळे (दै. संध्या)

ग्रामविकास विभागामार्फत राबवण्यात येणाऱ्या उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान व पंचायत समिती बारामती यांच्या अंतर्गत वडगाव-मोरगाव जिल्हा परिषद गटामध्ये महिलांसाठी विविध योजना राबवल्या जातात. त्या अंतर्गत मौजे मुढाळे या ठिकाणी मुर्डेश्वर महिला ग्राम संघाची स्थापना करण्यात आलेली आहे. त्यासाठी दिनांक १४/०८/२०२६ रोजी मुर्डेश्वर महिला ग्राम संघाची मासिक बैठक आयोजित करण्यात आली होती.या बैठकीसाठी ग्राम संघाचे अध्यक्ष,सचिव,कोषाध्यक्ष, व समूहातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.या बैठकीसाठी मुढाळे गावातील ग्राम सखी ज्योती दरेकर मॅडम तसेच वडगाव मोरगाव जिल्हा परिषद गटातील प्रभाग समन्वयक श्री.सिकंदर आत्तार यांनी उपस्थित महिलांना दिल्या जाणाऱ्या योजनांचे मार्गदर्शन केले. मौजे मुढाळे मध्ये उमेद अभियानाच्या कामकाजाची सुरुवात झाल्यापासून आज अखेर पर्यंत एकूण ३० महिला समुहांची स्थापना झालेली असून त्यापैकी महिलांच्या उद्योग व्यवसायासाठी उमेद अभियानाकडून २१ समूहांना एकूण ६ लक्ष १५ हजार रुपये खेळते भांडवल उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.तसेच CIF मधून आतापर्यंत १५ समूहांना ६०,००० प्रमाणे ९ लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. VRF निधी मधून एकल, विधवा व परित्यक्ता महिलांना १.५ लक्ष निधी दिला आहे.एकूण १ कोटी १३ लक्ष रुपयापर्यंतचे विविध बँकांचे अर्थसहाय उपलब्ध करून देण्यात आलेले आहे तसेच महिलांचे उद्योग व्यवसाय वाढीसाठी उमेद अभियाना मार्फत विविध प्रकारचे लोणचे,पापड, मसाला बनवण्याचे प्रशिक्षण देखील ४० महिलांना देण्यात आलेले आहे.इथून पुढेही महिलांना पुरेपूर निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे प्रभाग समन्वयक सिकंदर आत्तार यांनी यावेळी सांगितले.




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# महाडीबीटीमुळे योजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता व उत्तरदायित्व वाढले : मुख्यमंत्री फडणवीस

## 'महाडीबीटी'वर २९ नवीन योजनांसह आता १०५ योजना; उर्वरित सर्व योजना टप्प्याटप्प्याने आणण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न



### महाडीबीटी २.०

विविध योजनांसाठी एकाच ठिकाणी अर्ज करण्याची सुविधा नागरिककेंद्रित एकात्मिक प्रणाली महाडीबीटी २.० ने दिली आहे. सिंगल साइन-ऑन, रिअल-टाइम मॉनिटरिंगसाठी लाईव्ह डॅशबोर्ड आणि 'नो युवर बेनिफिट' यांसारख्या सुविधा या पोर्टलमध्ये उपलब्ध आहेत. ऑफलाईन प्रक्रियेतून ऑनलाइन प्रक्रियेकडे संक्रमण करताना मंजुरीची प्रक्रिया सुलभ करण्यावर तसेच नवीन योजना समाविष्ट करण्यासाठी लागणारा वेळ कमी करण्यावर भर देण्यात आला आहे. पोर्टलवर आधार आधारित पडताळणी, एंड-टू-एंड डिजिटल प्रक्रिया आणि पारदर्शक थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) यामुळे योजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता व उत्तरदायित्व वाढण्यास मदत होणार आहे. महाडीबीटीवर यापूर्वी ७६ योजना कार्यान्वित होत्या. १५ ऑगस्ट २०२६ रोजी आणखी २९ योजनांचा समावेश झाल्याने कार्यान्वित योजनांची एकूण संख्या १०५ झाली आहे. याशिवाय आणखी २३१ योजनांचे काम प्रक्रियेत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.पी, वित्त विभागाचे उपसचिव सुनील शिंदे, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील नागरिकांना विविध वैयक्तिक योजनांचा लाभ अधिक सुलभ, पारदर्शक आणि प्रभावी पद्धतीने मिळावा, यासाठी महाडीबीटी पोर्टलवर आज नव्याने २९ योजनांचे लोकार्पण (ऑनबोर्डिंग) करण्यात आले. त्यामुळे महाडीबीटीवर उपलब्ध योजनांची संख्या आता १०५ झाली आहे. शासनाच्या उर्वरित सर्व योजनाही टप्प्याटप्प्याने या एकाच व्यासपीठावर आणण्याचा प्रयत्न असून, त्याद्वारे नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ घेणे अधिक सोपे होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. महाडीबीटीची व्यवस्था सुरू झाल्यापासून शासनाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढले असून, योजनांचा गैरवापर लक्षणीयरीत्या कमी झाला आहे, असे त्यांनी नमूद केले.

सह्याद्री अतिथीगृह येथे स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने २९ नवीन योजनांच्या लोकार्पण (ऑनबोर्डिंग) कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. या प्रसंगी इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे मंत्री ॲड. आशिष शेलार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, माहिती तंत्रज्ञान आयुक्त भुवनेश्वरी पी. तसेच विविध विभागांचे प्रमुख अधिकारी प्रमुख उपस्थित होते.पात्र लाभार्थ्यांपर्यंत थेट आणि योग्य पद्धतीने लाभ पोहोचविण्यासाठी डिजिटल प्रणाली अधिक सक्षम करण्यावर शासनाचा भर असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केले. शासनाच्या 'सेकंड जनरेशन रिफॉर्म्स'अंतर्गत महाडीबीटी व्यवस्था अधिक सक्षम, कार्यक्षम आणि विश्वासार्ह करण्याचे काम सुरू आहे. विविध विभागांच्या योजनांचे टप्प्याटप्प्याने ऑनबोर्डिंग करण्यात येत असून, भविष्यात शासनाच्या सर्व प्रमुख योजना या एकाच डिजिटल व्यासपीठावर उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे नागरिकांना वेगवेगळ्या कार्यालयांमध्ये किंवा पोर्टलवर जाण्याची आवश्यकता कमी होऊन सेवा वितरण अधिक सुलभ होईल, असेही त्यांनी सांगितले.आज ऑनबोर्ड करण्यात आलेल्या २९ योजनांमध्ये इतर मागासवर्गीय विभाग तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या योजनांचा समावेश आहे. या योजनांचे महाडीबीटीवर यशस्वीपणे ऑनबोर्डिंग केल्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी संबंधित दोन्ही विभागांचे अभिनंदन केले. शासकीय सेवा आणि योजनांचा लाभ नागरिकांना घरबसल्या अथवा जवळच्या सेवा केंद्रातून कमीत कमी अडचणींसह मिळावा, यासाठी भविष्यातही नागरिककेंद्री डिजिटल सुधारणांना अधिक वेग देण्याच्या सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या. मंत्री ॲड. आशिष शेलार म्हणाले, माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत सातत्याने सुधारणा करण्यात येत आहेत. डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून सेवा वितरण अधिक गतिमान, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करण्यात येत आहे.

---

# थोडक्यात पण महत्वाचे

## लेक लाडकी योजनेचा लाभ मिळण्याची प्रक्रिया आता अधिक सुलभ!

मुंबई : मुलींच्या सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणारी लेक लाडकी योजना जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावी यासाठी योजनेची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यात आली आहे. लाभार्थी मुलींच्या पालकांना आता 'आपले सरकार' पोर्टलद्वारे थेट ऑनलाइन अर्ज करता येणार असून, अर्जासाठी आवश्यक कागदपत्रांची संख्या कमी होणार असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे. यापूर्वीच्या पात्र लाभार्थ्यांनाही संधी मिळावी यासाठी १ एप्रिल २०२३ पासून पात्र लाभार्थ्यांना १५ ऑगस्ट २०२७ पर्यंत अर्ज करता येणार आहे. त्यानंतर पोर्टलवर नोंदणी होणाऱ्या नवीन प्रकरणांसाठी मुलीच्या जन्मानंतर एक वर्षाच्या आत अर्ज करणे आवश्यक राहणार आहे. नवीन सुलभ प्रक्रियेत आधार क्रमांकाच्या आधारे आवश्यक माहिती ऑटो फेच होणार असून लाभार्थी, माता व पिता यांची ई-केवायसी करण्यात येणार आहे. त्यामुळे वारंवार कागदपत्रे सादर करण्याची गरज भासणार नाही. तसेच पुढील टप्प्यांतील लाभांसाठी पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता राहणार नाही. संलग्न बँक खात्यात थेट डीबीटीद्वारे लाभाची रक्कम जमा करण्यात येणार असल्याने बँक खात्याची स्वतंत्र माहिती सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही. तसेच, अंगणवाडी केंद्राशी संबंधित माहितीही लाभार्थ्यांना भरावी लागणार नाही. या सुलभीकरणामुळे अर्ज प्रक्रिया जलद, पारदर्शक आणि लाभार्थी केंद्रित होऊन अधिकाधिक पात्र मुलींना योजनेचा लाभ मिळण्यास मदत होणार असल्याचा विश्वास मंत्री तटकरे यांनी व्यक्त केला.

## पालकमंत्री पाटील यांच्याकडून बस अपघातातील जखमींची विचारपूस

सांगली : उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी खानापूर तालुक्यातील रेणावी घाटातील दोन बसच्या अपघातातील जखमींची भेट घेऊन आस्थेने विचारपूस केली व जखमींना दिलासा दिला. उपचारात कुठलीही अडचण येणार नाही, असे सांगून त्यांनी जखमींना लवकरात लवकर बरे होण्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष, उपविभागीय अधिकारी डॉ. विक्रम बांदल, तहसीलदार योगेश टोंपे, माजी नगराध्यक्ष व विद्यमान जिल्हा नियोजन समिती सदस्य वैभव पाटील यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. पालकमंत्री पाटील म्हणाले, खानापूर तालुक्यातील दोन बसेसच्या अपघातात तीन जणांचा मृत्यू झाला. एसटी महामंडळाने त्यांच्या कुटुंबाला त्वरित 10 लाख रुपये देण्याचे ठरवले आहे. त्याव्यतिरिक्त, स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे अपघात विमा योजनेतून प्रत्येकी 2 लाख आणि मुख्यमंत्री मदत कक्षामधून प्रत्येकी 4 लाख अशा संयुक्त मदतीसाठी कार्यवाहीच्या अनुषंगाने यंत्रणांना सूचना दिल्या आहेत. जखमींच्या उपचाराचा खर्च एसटी महामंडळ करणार आहे. फॉलोअप उपचारासाठी आमच्या ट्रस्टच्या माध्यमातून मदत केली जाईल, असे ते म्हणाले. विटा येथील एका खाजगी रुग्णालयात आज रोजी 8 जखमींवर उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती स्थिर आहे. इतर 20 जखमींना उपचार करून डिस्चार्ज देण्यात आला आहे.

## भंडारा जिल्ह्याचा सर्वांगीण विकास आणि शाश्वत प्रगतीचा संकल्प

भंडारा : भारतीय स्वातंत्र्याच्या ८० व्या स्वातंत्र दिनानिमित्त भंडारा जिल्ह्याने ग्रामविकास, पर्यावरण संवर्धन, कृषी, मत्स्यव्यवसाय, शिक्षण, रोजगार आणि सांस्कृतिक क्षेत्रात भंडारा जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल नगर विकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण तसेच अल्पसंख्यांक विकास व औकाफ विभागाच्या राज्यमंत्री माधुरी मीरा सतीश मिसाळ यांनी विशेष कौतुक केले. जिल्हाधिकारी कार्यालय आयोजित ८० स्वातंत्र्य दिनाच्या ध्वजारोहण प्रसंगी त्या बोलत. यावेळी नगराध्यक्ष मधुरा मदनकर, जिल्हाधिकारी सावन कुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंदकुमार साळवे, पोलीस अधीक्षक नुरूल हसन, उपवनसंरक्षक योगेंद्र सिंह, अतिरिक्त जिल्हाधिकारी राजेंद्र जाधव, अपर पोलीस अधीक्षक निलेश मोरे, निवासी उपजिल्हाधिकारी मनोहर चव्हाण, यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. ग्रामपंचायत ईटगावने दीनदयाल उपाध्याय पंचायत सशक्तीकरण पुरस्कारांतर्गत 'बालस्नेही पंचायत' या राष्ट्रीय पुरस्कारात देशात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या कामगिरीबद्दल ग्रामपंचायतीला एक कोटी रुपयांचे पारितोषिक व सन्मानचिन्ह मिळाले आहे. ही बाब जिल्ह्यासाठी अतिशय कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

---

# स्वातंत्र्य दिनानिमित्त राज्यपालांकडून पुणे येथे स्वागत समारंभ




■ पुणे(दै. संध्या)

भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आज संध्याकाळी पुणे येथील लोकभवनाच्या हिरवळीवर स्वागत समारंभाचे (ॲट होम रिसेप्शन) आयोजन केले. यावेळी राज्यपाल व त्यांच्या पत्नी सुधा देव वर्मा यांनी उपस्थित विविध क्षेत्रातील मान्यवरांना भेटून स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. स्वागत समारंभाला खासदार श्रीरंग बारणे, विधानपरिषदेच्या माजी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, माजी राज्यमंत्री दिलीप कांबळे, दक्षिण कमांडचे जनरल ऑफिसर कमांडिंग लेफ्टनंट जनरल राजेश पुष्कर, राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (NDA), खडकवासला येथील कमांडंट व्हाइस ॲडमिरल अनिल जग्गी, विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी व प्रकुलगुरू डॉ. पराग काळकर, सीओईपी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. सुनील भिरूड व कुलसचिव प्रा. दयाराम सोनवणे, माजी पोलीस महासंचालक प्रवीण दीक्षित, जनसेवा फाउंडेशनचे संस्थापक डॉ. विनोद शहा, न्यायमूर्ती (निवृत्त) मदन गोसावी, पद्मश्री गिरीश प्रभुणे यांच्यासह सशस्त्र दल तसेच प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी आणि इतर मान्यवर उपस्थित होते. राष्ट्रगान, राष्ट्रगीत व राज्यगीताने स्वागत समारंभाची सुरुवात झाली तर चहापानानंतर राष्ट्रगान व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# तंत्रज्ञानाच्या बळावर महाराष्ट्र देशाला महासत्ता बनवेल : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

■ ठाणे(दै. संध्या)

सक्षम शेतकरी, कर्तृत्ववान युवक, सशक्त महिला आणि आनंदी नागरिक हीच आपल्या विकासाची खरी व्याख्या असून शेतकऱ्यांचा सन्मान, कामगारांचा घाम, महिलांचा आत्मविश्वास, युवकांची ऊर्जा आणि आधुनिक तंत्रज्ञानाची ताकद एकत्र आणून आपण महाराष्ट्र आणि भारताला जगातील सर्वोत्कृष्ट राष्ट्र बनवू, असा ठाम विश्वास राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे व्यक्त केला.

भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात आयोजित मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळ्यात ते बोलत होते.या सोहळ्यास खासदार नरेश म्हस्के, आमदार रवींद्र फाटक, आमदार संजय केळकर, आमदार माधवी नाईक, महापौर शर्मिला पिंपोळकर, ठाणे महापालिकेचे उपमहापौर हनुमंत जगदाळे, ठाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव, ठाणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, यांच्यासह इतर अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते.

समारंभाच्या सुरुवातीला उपमुख्यमंत्री एकाथ शिंदे यांनी महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज, स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, महात्मा जोतीराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन केले. स्वातंत्र्यलढ्यात प्राणांचे बलिदान देणाऱ्या सर्व ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यवीरांच्या त्यागाचे स्मरण करत त्यांनी तमाम जनतेला स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. उपमुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या १२ वर्षांत भारताने अवकाश संशोधन, डिजिटल तंत्रज्ञान, ऊर्जा स्वावलंबन आणि संरक्षण क्षेत्रात अभूतपूर्व गगनभरारी घेतली आहे. 'ब्रह्मोस' क्षेपणास्त्रासारख्या तंत्रज्ञानाने संरक्षण क्षेत्र आत्मनिर्भर बनले असून, झिरो टॉलरन्स धोरणामुळे नक्षलवादाचा बीमोड होऊन शांतता, सुरक्षा आणि विकास हीच देशाची त्रिसूत्री बनली आहे. या राष्ट्रीय प्रवासात महाराष्ट्राने नेहमीच आघाडी घेतली असून राज्य १ ट्रिलियन डॉलरच्या अर्थव्यवस्थेकडे वेगाने वाटचाल करत आहे.बळीराजाच्या कल्याणाचा पुनरुच्चार करताना ते म्हणाले की, राज्याच्या तिजोरीवर पहिला हक्क शेतकऱ्यांचा असून शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' लागू केली आहे.



---

# सामान्य नागरिकाला दर्जेदार आरोग्य सेवा देणार : उपमुख्यमंत्री शिंदे






■ कोल्हापूर (दै. संध्या)

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते राज्यातील १२४ आरोग्य संस्थांचे उद्घाटन तसेच ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथील उपजिल्हा रुग्णालय आणि खर्डी येथील ग्रामीण रुग्णालयाचे उद्घाटन दूरदृश्य प्रणालीद्वारे संपन्न झाले. यामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत नव्याने उभारण्यात आलेल्या 44 प्राथमिक आरोग्य व 74 शहरी आरोग्यवर्धिनी केंद्रांचा समावेश आहे. राज्यातील सामान्य नागरिकाला दर्जेदार आरोग्य सेवा देण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी सांगितले.

ते म्हणाले ,आज या आरोग्य संस्थेचे लोकार्पण होत आहे हा आरोग्य सेवेसाठी अत्यंत गौरवपूर्ण व अभिमानास्पद क्षण आहे. राज्याला तज्ज्ञ डॉक्टर देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. त्याचबरोबर कंत्राटी कामगारांच्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक आहे. शासनाने कॅशलेस उपचारांची सुविधा सुरू केली.

पालकमंत्री आबिटकर म्हणाले, आज 124 आरोग्य संस्थांच्या लोकार्पणाचा कार्यक्रम होतो आहे. हा आरोग्य विभागाच्या दृष्टीने अत्यंत संस्मरणीच क्षण आहे.वैद्यकीय यंत्रसामग्रीअभावी अनेक रुग्णालये बंद होती ती कार्यरत करण्यात आली आहेत. ग्रामीण भागातील पीएससी लेवलला महात्मा फुले जन आरोग्य योजना कार्यान्वित करण्याचा आरोग्य विभागाचा प्रयत्न सुरू आहे. राज्यातील गरीब रुग्ण पैशाअभावी उपचारांपासून वंचित राहू नये यासाठी शासन प्रयत्नशील आहे. खाजगी हॉस्पिटलच्या धर्तीवर राज्याच्या आरोग्य विभागाला अद्ययावत करण्याला आपले प्राधान्य राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांचा संदेश सादर करण्यात आला .प्रारंभी आरोग्य सेवा तथा अभियान संचालक (राआअ) मुंबई संजय काटकर यांनी प्रास्ताविक केले. ऑनलाईन पद्धतीने आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर,वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल आमदार सर्वश्री किसन कथोरे, ज्ञानेश्वर म्हात्रे , दौलत दरोडा,शरद सोनवणे,प्रकाश सोळंके,विनोद निकोले,आरोग्य विभागाचे प्रधान सचिव निपुण विनायक आदी सहभागी झाले होते.

यावेळी पालकमंत्र्यांच्या हस्ते महा पल्स-ए आय प्रकल्पाच्या अनुषंगाने कोल्हापूर जिल्ह्यासाठी कृत्रिम बुद्धीवर आधारित-जिल्हा आरोग्य कमांड सेंटरच्या पोस्टरचे अनावरण करण्यात आले. या प्रकल्पांतर्गत जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील 104 शासकीय आरोग्य संस्था,जिल्हा रुग्णालये, उप जिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये तसेच 82 प्राथमिक आरोग्य केंद्रे एकाच डिजिटल व्यासपीठावर जोडली जाणार असून या कमांड सेंटरद्वारे एकाच छताखाली नागरिकांना सर्व सुविधा मोफत उपलब्ध होणार आहेत. कोल्हापूर जिल्ह्याच्या यशस्वी अंमलबजावणी नंतर आरोग्य विभागातर्फे हा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्रात टप्प्याटप्प्याने राबविण्यात येणार आहे.भारतीय तंत्रज्ञान संस्था आयआयटी-मंडी यांच्या सहकार्याने हा प्रकल्प राबविण्यात येत आहे . यावेळी आरोग्य उपसंचालक डॉ.दिलीप माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अनिरुद्ध पिंपळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सरिता थोरात,सहा. संचालक डॉ.संजय रणवीर आदी उपस्थित होते. (प्राथमिक) आरोग्य सेवा – मुंबई येथील संचालक डॉ.विजय कंदेवाड यांनी आभार मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### आ. शेखर निकम यांनी चिपळूण-संगमेश्वर मतदारसंघातील पुनर्वसित गावांचे प्रश्न मांडले

**मुंबई : दैनिक संध्या**

पुनर्वसित गावांमधील विविध प्रश्नांबाबत मा. पुनर्वसन मंत्री श्री. मकरंद जाधव (पाटील) यांच्या दालनात, त्यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वाची बैठक झाली. यावेळी या बैठकीत आमदार शेखर निकम*यांनी चिपळूण संगमेश्वर मतदारसंघातील पुनर्वसित गावांच्या समस्या व नागरिकांच्या मागण्या मुद्देसूदपणे मांडल्या. अतिवृष्टी, दरड कोसळणे आणि भूस्खलनामुळे बाधित झालेल्या नागरिकांचे सुरक्षित व कायमस्वरूपी पुनर्वसन तसेच पुनर्वसित गावांमध्ये आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. यावेळी तिवरे, पेढे - कुंभारवाडी,गोवळकोट-कदमवाडी, बौद्धवाडी-कोळकेवाडी तसेच कोंढ्रण (संगमेश्वर) येथील पुनर्वसित नागरिकांच्या प्रश्नांची चर्चा झाली. बाधित नागरिकांना केवळ स्थलांतरित न करता त्यांचे सुरक्षित ठिकाणी कायमस्वरूपी पुनर्वसन करण्याची गरज आमदार निकम यांनी मांडली. पुनर्वसित नागरिकांसाठी सध्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मिळणारे ₹२ लाख १० हजार रुपयांचे अनुदान आहे ते अनुदान वाढवून मिळणेबाबत तसेच सध्या ५०० चौ.फुटांची जागा मिळत आहे ती जागा वाढवून मिळणेबाबत धोरणात्मक निर्णय शासनाने घ्यावा.अशी आग्रही मागणी आमदार शेखर निकम यांनी मंत्री महोदय यांचेकडे केली यावर मंत्री महोदयांनी सकारात्मकता दाखवली. या निर्णयामुळे पुनर्वसित कुटुंबांना अधिक चांगल्या व प्रशस्त घरांची सुविधा मिळण्यास मदत होईल. पुनर्वसित गावांमधील नागरी सुविधा आणि इतर प्रलंबित कामांना गती देण्याबाबतही संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली. या बैठकीस सार्वजनिक बांधकाम मंत्री महोदय शिवेंद्रराजे भोसले साहेब, मंत्री महोदय भरतशेठ गोगावले साहेब, आमदार मनोज घोरपडे, आमदार शंकर मांडेकर, पुनर्वसन विभागाचे सचिव तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

### स्वातंत्र्यदिनानिमित्त विद्या प्रतिष्ठान येथे युगेंद्र पवार यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण संपन्न



**बारामती : दैनिक संध्या**

८० व्या भारतीय स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधत विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात आयोजित ध्वजारोहण समारंभाला उपस्थित राहून युगेंद्र पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.भारतीय स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या असंख्य स्वातंत्र्यसैनिकांचे स्मरण करत यावेळी त्यांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. या समारंभाला विद्या प्रतिष्ठानचे सन्माननीय सदस्य,सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मित्र - मैत्रिणी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वातंत्र्य,लोकशाही आणि राष्ट्राच्या प्रगतीची मूल्ये जपत देशाच्या विकासात आपले योगदान देण्याचा संकल्प यावेळी सर्वांनी केला. यावेळी सर्वांना स्वातंत्र्यदिनाच्या हार्दिक शुभेच्छाही देण्यात आल्या.

### देहदान करणाऱ्या कुटुंबीयांचा मंगळवारी कृतज्ञता सन्मान सोहळा

**बारामती : दैनिक संध्या**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, बारामती येथील शरीररचनाशास्त्र विभागाच्या वतीने देहदान करणाऱ्या व्यक्तींच्या कुटुंबीयांचा कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मंगळवार दिनांक १८ ऑगस्ट रोजी सन्मान करण्यात येणार आहे. हा सन्मान सोहळा सकाळी ११ वाजता महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. आपल्या प्रिय व्यक्तीच्या निधनानंतरही समाजहिताचा विचार करून देहदानाचा निर्णय घेणाऱ्या कुटुंबीयांप्रती आदर व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आयोजित या कार्यक्रमास अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून, अधिष्ठाता डॉ. अंजली पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी देहदान व अवयवदानाचे महत्त्व आणि त्याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. नागरिकांनी या मानवतावादी कार्यात सहभागी व्हावे असे आवाहन डॉ. पाटील यांनी केले आहे.



### सासवडमध्ये स्वातंत्र्य सैनिक स्मारकास अभिवादन

**सासवड : दैनिक संध्या**

स्वातंत्र्य दिनानिमित्त सासवड (ता.पुरंदर) येथील गांधी मैदानातील 'स्वातंत्र्य सैनिक स्मारक'येथे आजी-माजी सैनिक प्रतिष्ठान पुरंदर आणि स्वातंत्र्य सैनिक परिवार यांच्या वतीने स्वातंत्र्य सैनिकांना अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमात ब्रिटीश सरकारविरोधी स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतलेल्या आणि तुरुंगवास भोगलेल्या पुरंदर परिसरातील स्वातंत्र्य सैनिकांना पुष्पांजली वाहण्यात आली. यावेळी ज्येष्ठ प्राध्यापिका इंदिरा रावसाहेब पवार, किरण पुरंदरे, धनंजय जगताप, संदीप इनामके, आस्लम आत्तार, दिगंबर म्हेत्रे, अमृता म्हेत्रे, दिलीप चौधरी, निरंजन जगताप आदी उपस्थित होते. स्वातंत्र्य चळवळीत योगदान देणाऱ्या पूर्वजांच्या आठवणी फक्त स्वातंत्र्य दिनानिमित्त नव्हे, तर कायम आपल्या स्मरणात असाव्यात, असा संदेश इंदिरा पवार यांनी दिला. तर स्वातंत्र्य सैनिक स्मारकाचे सुशोभीकरण व्हावे आणि त्यांच्या स्मृतींना कायम उजाळा मिळावा, यासाठी ग्रामस्थांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन माजी सैनिक किरण पुरंदरे यांनी केले. पुरंदरची 'बारडोली' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सासवड परिसरातील स्वातंत्र्यपूर्व काळातील ऐतिहासिक घटनांवर आधारित माहितीपर पुस्तक आणि चित्रपट लवकरच आणला जाईल, अशी माहिती चित्रपट कला दिग्दर्शक संदीप इनामके यांनी दिली. तसेच, हा ऐतिहासिक ठेवा नवीन पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी शासकीय व ग्रामस्थांच्या पातळीवर पाठपुरावा केला जाईल, असे बांधकाम व्यावसायिक आस्लम आत्तार यांनी सांगितले.

# सासवडसह पुरंदरमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

■ सासवड (दै. संध्या)



देशाचा ८० वा स्वातंत्र्य दिवस सासवड व पुरंदर तालुक्यात सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. येथील येथील पालखी तळावर असणा-या ग्रामीण भागातील सर्वांत उंच ध्वजस्तंभावरील ध्वजारोहण नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप यांच्या उपस्थितीत आणि ब्रिगेडीयर डॉ.संजीव देवस्थळी यांच्या हस्ते संपन्न झाला. शिवस्मृती प्रतिष्ठानचे सदस्य व पालीकेचे पदाधिकारी उपस्थित होते. सैन्यदलात भरती झालेल्या पुरंदर तालुक्यातील १९ जवानांचा सन्मान याप्रसंगी करण्यात आला. मुख्य शासकीय ध्वजारोहणाचा सोहळा पोलीस परेड मैदानावर सकाळी ठीक ९ वाजून ५ मिनिटांनी उपविभागीय अधिकारी वर्षा लांडगे यांच्या हस्ते तसेच तहसीलदार विक्रम राजपूत, जिल्हा परिषद सदस्य हरीभाऊ लोळे, पोलीस निरीक्षक संतोष घोळवे व अन्य शासकीय अधिका-यांच्या उपस्थितीत पार पडला. पालखी तळ आणि मुख्य शासकीय ध्वजारोहणावेळी सासवड पोलीस ठाणे, होमगार्ड, वाघिरे महाविद्यालय, कन्या प्रशाला, इंग्लिश मीडियम स्कूल आणि नगरपरिषदेच्या शाळांच्या पथकाने मानवंदना दिली.

दरम्यान सासवड नागपालिकेत नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप यांच्या हस्ते व सर्व नगरसेवक व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण झाले. याबरोबरच सर्व शैक्षणिक संस्था, विद्यालये, बँका, पतसंस्था, सासवड आश्रम ट्रस्ट, सासवड कोर्ट, शासकीय कार्यालये या ठिकाणी तेथील पदाधिकाऱ्यांच्या हस्ते ध्वजरोहण करून स्वातंत्र्यदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. सासवड न्यायालयात मुख्य न्यायाधिश तुकाराम मोटे यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले त्या प्रसंगी सतीश शिंदे व रविंद्र सावंत हे सहन्यायाधीश, बारचे सदस्य व अन्य कर्मचारी उपस्थित होते. सासवड आश्रम ट्रस्टमध्ये अँड अण्णासाहेब खाडे तर कस्तुरबा आश्रमात डॉ भास्कर आत्राम व अन्य डॉक्टर्स यांच्या उपस्थितीत ध्वजारोहन झाले. सासवड नगरपालिकेत नगराध्यक्षा आनंदी काकी जगताप यांच्या हस्ते व मुख्याधिकारी डॉ कैलास चव्हाण व जेजुरी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त अँड विश्वास पानसे यांच्या समवेत झेंडावंदन झाले. जेजुरी देवस्थान तर्फे नगरपालिकेच्या शालेय विदयार्थ्यांना वॉटर फिल्टर साठी यावेळी ८४ हजारांचा धनादेश देण्यात आला.वाघीरे महा विदयालयात प्राचार्य डॉ पंडित शेळके फार्मसी कॉलेजच्या डॉ राजश्री चव्हाण यांच्या हस्ते तर वाघीरे विद्यालयात सेवानिवृत्त मेजर नितीन राऊत व नामदेव कोन्हाळे यांच्या हस्ते ध्वज फडकवण्यात आला. आचार्य अत्रे प्रतिष्ठान येथे विजय कोलते व डॉ राजेश दळवी तर पुरंदर हायस्कूल मध्ये प्रा इस्माईल सय्यद यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले.

### ग्रामीण भागातही उत्साही झेंडा वंदन

सासवडप्रमाणे तालुक्याच्या ग्रामीण भागात देखील स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. साकुर्डे येथे मातोश्री जिजाई सोपान जाधव विदयालयात स्व एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानचे संतोष जगताप तर नायगाव येथे सिद्धेश्वर विदयालयात अमोल कामठे यांनी झेंडा वंदन केले.नायगावच्या १९९३ च्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी विदयालयास ३६ हजार रुपये किंमतीचा स्पीकर सेट भेट देवून कृतज्ञता व्यक्त केली. विदयालयाने सीमा साळवे व सुरेखा रावडे या माजी विदयार्थिनींना ध्वज पुजनाचा मान दिला.खळद येथे ग्रामगौरव (पाणी पंचायत) मध्ये श्रमाला प्रतिष्ठा देण्याच्या हेतूने आशाताई जाधव या संस्थेच्या महिला कर्मचाऱ्यांच्या हस्तेध्वजारोहण करण्यात आले. अनाथांची माय असलेल्या पद्मश्री कै सिंधुताई सकपाळ यांच्या कुंभारवळण येथील ममता बाल सदन येथे व्यवस्थापक दिपक गायकवाड यांनी ध्वजारोहण केले.

## ८० वा स्वातंत्र्य दिन पुरोगामी विद्यालयात उत्साहात साजरा



■ हवेली (दै. संध्या)

भारतीय स्वातंत्र्याचा ८० वा स्वातंत्र्य दिन पुरोगामी माध्यमिक विद्यालय नायगाव ता.हवेली येथे मोठ्या थाटात आणि दिमाखात साजरा झाला. पुरोगामी शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेच्या विश्वस्त श्रीमती संगीताताई सुभाष चौधरी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तर स्काऊट गाईड च्या विद्यार्थ्यांनी ध्वजाला व मान्यवरांना संचलनातून मानवंदना दिली. विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक श्री विठ्ठल ठोंबरे यांनी विद्यार्थ्यांना साक्षरतेची शपथ दिली. तसेच विद्यार्थ्यांनी पाहुण्यांसमोर संगीत कवायत सादर केली. यावेळी विद्यालयाच्या हितचिंतकांनी बक्षिसासाठी ठेवलेल्या ठेवींच्या व्याजाच्या रकमेतून गेल्यावर्षीच्या विविध स्पर्धा व परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांना जवळ जवळ लाखोंची बक्षिसे देण्यात आली.याचे संयोजन शिक्षिका सौ वंदना चौधरी रोहिणी म्हेत्रे,विकासवर्धन वाघमारे, अस्मिता गायकवाड यांनी केले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी समुह गीतातून तसेच आपल्या भाषणातून देशाप्रती आणि देश स्वतंत्र करण्यासाठी ज्यांनी अखंड प्रयत्न केले आणि आपल्या प्राणांची आहुती दिली त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी संस्थेचे सचिव रंगनाथ आप्पा कड यांनी विद्यार्थ्यांना संस्कृती आणि संस्कार जोपासण्याची शपथ दिली. संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब चोरघे यांनी सांगितले की भारत स्वतंत्र करणा-या स्वातंत्र्य सैनिकांना इंग्रजांनी अनेक प्रकारे त्रास दिला.भारतीय जनतेचा अतोनात छळ केला परंतु ते आपल्या ध्येयापासून तसूभरही हलले नाहीत,त्यांची जाणिव ठेवून आपला देश कसा सुजलाम सुफलाम होईल.यासाठी विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेऊन प्रयत्न केले पाहिजेत.तर भाजपा प्रदेश महिला आघाडीच्या सरचिटणीस सौ.पुनमताई चौधरी यांनी मुलींनी निर्भय होऊन समाजात वावरावे चुकिच्या गोष्टींना कडाडून विरोध करावा आणि आपण आत्मनिर्भर बनावे असे सांगितले.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे उपाध्यक्ष रामदास चौधरी, विश्वस्त दत्तात्रय चौधरी, सोनबा चौधरी, सुनील चोरघे, तुळशीराम चौधरी, शिवाजी चौधरी, अनिल लोणकर,राघवदास चौधरी, रवींद्र चौधरी, सामाजिक कार्यकर्ते संदीप म्हस्के, श्री चंद्रकांत गुंजाळ ,संजय चौधरी,माधव लांडगे, श्री शांताराम उरसळ, शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा शिल्पा बिराजदार, अनेक पालक, ग्रामस्थ पदाधिकारी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रवीण गायकवाड यांनी प्रास्ताविक केले तर सविता देवकर व दिलीप थोपटे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.


## खडतर रस्त्यांमुळे नाराजी

■ जुन्नर (दै. संध्या)

जुन्नर तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागामध्ये हजारो पर्यटकांनी पर्यटनाचा आस्वाद घेत वर्षाविहाराचा आनंद लुटला. शनिवार ता. 15 ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्ताने असलेली सुट्टी व रविवार या सलग दोन सुट्ट्यांमुळे तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागात मध्ये पर्यटकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागातील पर्यटन स्थळांकडे पोहोचताना रस्त्यांच्या दुरावस्थेमुळे मात्र पर्यटकांना कसरत करावी लागत होती रस्त्यांच्या दुरावस्थेमुळे पर्यटकांमधून तीव्र प्रमाणात नाराजी व्यक्त करण्यात येत होती. पावसाळ्यामध्ये जुन्नरच्या पश्चिम आदिवासी भागातील नाणेघाट व दाऱ्याघाट या प्रमुख पर्यटन स्थळांकडे पर्यटक आकर्षित होत असतात. सुट्ट्यांमुळे गर्दीचे प्रमाण लक्षणीय होते. पुणे, अहिल्यानगर, नाशिक, मुंबई, ठाणे, कल्याण या भागातून पर्यटक मोठी वाहने घेऊन पर्यटनासाठी आले होते. दुचाकीस्वारांची संख्या देखील मोठ्या प्रमाणावर होती. पर्यटकांची गर्दी एवढ्या प्रमाणात होती की जुन्नर शहरातील तसेच पर्यटनस्थळी असलेल्या हॉटेल मध्ये निवासासाठी खोल्या देखील उपलब्ध झाल्या नाहीत.

## डॉ. संकेत रमाकांत लोढा यांना व्यवस्थापन विज्ञानातील पी.एच.डी. पदवी

■ लोणी काळभोर (दै. संध्या)



कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग आणि व्यवस्थापन विज्ञान क्षेत्रातील सातत्यपूर्ण संशोधन व अध्यापनामुळे ओळखले जाणारे डॉ. संकेत रमाकांत लोढा यांना एमजीएम विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांनी डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी पदवी प्रदान केली आहे. त्यांचा प्रबंध "ग्राहक विभागणी वापरून मशीन लर्निंग आधारित विपणन विश्लेषण" विद्यापीठाच्या अधिकृत अधिसूचनेनुसार यशस्वीरीत्या मंजूर झाला असून ३१ जुलै २०२६ रोजी संपन्न झालेल्या व्हायवा-व्होसे परीक्षेनंतर त्यांना ही पदवी प्रदान करण्यात आली. या प्रबंधाचे मूल्यमापन गृह मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत येणाऱ्या नॅशनल फॉरेन्सिक सायन्सेस युनिव्हर्सिटीसारख्या राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्थेतील तज्ज्ञ परीक्षकांनी केले. त्याचबरोबर भारतीय तंत्रज्ञान संस्थेतील डॉ. चौधरी यांनीही स्वतंत्रपणे परीक्षण पूर्ण केले. डॉ. लोढा यांना अध्यापन व उद्योग क्षेत्रात तेरा वर्षांहून अधिक अनुभव आहे. ते अटल फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राममध्ये तज्ज्ञ वक्ते म्हणून मार्गदर्शन करतात आणि गूगल डेव्हलपर ग्रुप्समध्ये फॅकल्टी अँड्वायझर म्हणून कार्यरत आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात पेपर सेटर, चेअरमन, एक्सटर्नल एक्झामिनर, सेशन चेअर, जज व रिसोर्स पर्सन म्हणूनही ते सक्रिय आहेत. विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये ते तज्ज्ञ वक्ते म्हणून सहभागी होतात. आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांची संशोधन ओळख लक्षणीय आहे. युरोपियन जर्नल ऑफ कॉम्प्युटर सायन्सेस अँड इन्फॉर्मॅटिक्स, युरोपियन जर्नल ऑफ सायंटिफिक रिसर्च अँड रिव्ह्यूज आणि जर्नल ऑफ अँडव्हान्स्ड व्हेटेरिनरी अँड अँडनिमल रिसर्च या नियतकालिकांचे ते समीक्षक आहेत. कॉम्पसाय अँड एआय अँडव्हान्सेस (कोलंबस, ओहायो, युएसए) या नियतकालिकाचे आंतरराष्ट्रीय संपादक तसेच ऑस्ट्रेलियन बिझनेस डीन्स कौन्सिल मान्यताप्राप्त एम्पिरिकल इकॉनॉमिक्स लेटर्सचे अतिथी संपादक म्हणूनही ते काम पाहतात. आयईईई कॉन्फरन्स समीक्षक म्हणूनही त्यांचे योगदान सुरू आहे. बौद्धिक संपदा क्षेत्रातही त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित प्रणाली, ग्राहक विभागणी, रीसायकलिंग बिन, आयओटी आधारित उपकरणे आणि आरोग्यविषयक तंत्रज्ञान याबाबत अनेक डिझाईन पेटंट, युटिलिटी पेटंट व कॉपीराइट्स त्यांच्या नावावर आहेत. त्यांना मिळालेल्या प्रमुख पुरस्कारांमध्ये राज्यस्तरीय शिक्षक रत्न पुरस्कार २०२४, नॅशनल एन्व्हायर्नमेंट वॉरियर पुरस्कार २०२४, विश्व इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी राइट रिसर्च एक्सलन्स पुरस्कार २०२४, रिसर्च एक्सलन्स पुरस्कार २०२४ आणि विद्याभूषण पुरस्कार २०२५ यांचा समावेश आहे. डॉ. संकेत रमाकांत लोढा यांची ही पीएच.डी. पदवी, राष्ट्रीय स्तरावरील प्रबंध मूल्यमापन, आंतरराष्ट्रीय संशोधन योगदान, संपादकीय जबाबदाऱ्या, पेटंट्स, पुस्तके, संशोधन लेख आणि विविध पुरस्कार यामुळे महाराष्ट्रासह देशातील संशोधन व उच्च शिक्षण क्षेत्रात त्यांचे स्थान विशेष उल्लेखनीय ठरले आहे.

दोन संशोधन लेखांची नासा, स्मिथसोनियन इन्स्टिट्यूशन आणि हार्वर्ड एडीएस डेटाबेसमध्ये अनुक्रमणिका झाली आहे. अनेक लेख स्कोपस व आयईईई एक्सप्लोरमध्ये प्रकाशित झाले असून कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, डेटा सायन्स, सायबर सुरक्षा, डिजिटल मार्केटिंग आणि आरोग्य तंत्रज्ञान या विषयांवरील त्यांचे लेख आयईईई, स्प्रिंगर, स्कोपस आणि इतर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नियतकालिकांमध्ये समाविष्ट आहेत. शैक्षणिक लेखन क्षेत्रात पायथन, डेटा सायन्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाउड कॉम्प्युटिंग आणि अल्गोरिदम या विषयांवरील अनेक पुस्तके व पुस्तक प्रकरणे त्यांनी प्रकाशित केली आहेत.

# कौशल्याधारीत शिक्षण ग्रामीण भागापर्यंत पोहोचवा : चंद्रकांत पाटील

### डॉ. स्वाती मुजुमदार यांच्या सिम्बायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या कुलपतीपदी नियुक्तीनिमित्त गौरव सोहळ्याचे आयोजन

■ पुणे (दै. संध्या)



सध्याच्या काळात कौशल्य विकासाला अत्यंत महत्त्व असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना कौशल्य आधारित शिक्षण प्रशिक्षण देण्यासाठी शैक्षणिक संस्थांनी पुढाकार घ्यावा. त्यासाठी असा संस्थांना शासनाकडून आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील, अशी ग्वाही उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली

सिम्बायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी च्या कुलपती पदावर डॉ. स्वाती मुजुमदार यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, सिंबायोसिसचे अध्यक्ष डॉ. शां ब मुजुमदार, सौ. संजिवनी मुजुमदार आदि मान्यवर उपस्थित होते. सध्याच्या काळात संपूर्ण जगात कौशल्य आत्मसात करण्याला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. कौशल्य प्राप्त झालेली युवा पिढी स्वतःचा आणि पर्यायने समाजाचा व देशाचा विकास घडवू शकते. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत कौशल्य शिक्षण पोहोचविण्यासाठी शिक्षण संस्थांनी पुढाकार घ्यावा. त्यांना शासनाकडून सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधा आणि प्रोत्साहन पर योजना उपलब्ध करून दिल्या जातील, असे चंद्रकांत पाटील यांनी यावेळी सांगितले. डॉ स्वाती मुजुमदार यांनी कौशल्य विकासासाठी आणि कौशल्य प्रशिक्षणासाठी जागतिक पातळीवर मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली सिंबायोसिस कौशल्य विकास आणि व्यवसाय प्रशिक्षण विद्यापीठ मोठी झेप घेईल, असा विश्वास पाटील यांनी व्यक्त केला. महाराष्ट्राला कौशल्य विकास व प्रशिक्षण यामध्ये अग्रेसर स्थान प्राप्त करून देण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वप्न सिंबायोसिस आणि मुजुमदार परिवाराने पूर्ण केले आहे. भविष्यात सिंबायोसिस कौशल्य व व्यावसायिक शिक्षण विद्यापीठ जगातील कौशल्य विकासाचे महत्त्वाचे केंद्र ठरेल, असा विश्वास मंगल प्रभात लोढा यांनी व्यक्त केला. इंग्रजांनी भारतात सुरू केलेली शिक्षण पद्धती आजही अमलात आणली जात आहे. मात्र, सध्याच्या काळात कौशल्य विकासाला प्राप्त झालेले महत्त्व लक्षात घेऊन सिंबायोसिसने कौशल्य विकासासाठी स्वतंत्र विद्यापीठाची स्थापना केली. कौशल्य विकास व प्रशिक्षण क्षेत्रात भारत अग्रेसर राहावा यासाठी केंद्र व राज्य शासनाने पुढाकार घेतला पाहिजे, अशी अपेक्षा डॉ. मुजुमदार यांनी व्यक्त केली.

गतिमान व प्रगतिशील राजकीय नेतृत्व प्राप्त झाले तर मोठ्या गोष्टी साध्य करणे शक्य होते. सिंबायोसिस कौशल्य विकास व व्यवसाय प्रशिक्षण विद्यापीठ हे त्याचे उदाहरण आहे, असे डॉ. स्वाती मुजुमदार यांनी नमूद केले. तत्कालीन शिक्षण मंत्री विनोद तावडे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा या विद्यापीठाच्या उभारणीत मोठा वाटा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. उद्योगांच्या मनुष्यबळाबाबत गरजा लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण दिले जाते. या विद्यापीठातील अभ्यासक्रम केवळ प्राध्यापक आणि शिक्षण तज्ञ निश्चित करत नाही तर त्यासाठी उद्योग क्षेत्रातील मान्यवरांना सहभागी करून घेतले जाते. विद्यापीठाचा 200 हून अधिक अग्रेसर उद्योगांशी सहकार्य करार झालेला आहे. त्यामुळे विद्यापीठातील विद्यार्थ्यांना उद्योगांच्या गरजेनुसार प्रशिक्षण आणि कारकीर्द घडवण्याच्या संधी उपलब्ध होत आहेत, असेही डॉ. स्वाती मुजुमदार यांनी स्पष्ट केले. तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत कौशल्य प्रशिक्षण पोहोचविण्यासाठी विद्यापीठाच्या वतीने पदविका अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यात आले असून त्यात 90% महिलांचा सहभाग आहे. हे प्रशिक्षण प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांपैकी 25 टक्के विद्यार्थ्यांनी स्वतःचे स्वतंत्र व्यवसाय सुरू केले आहे, अशी माहिती ही त्यांनी दिली.

डॉ. सुनिता निकम, परीक्षा नियंत्रक यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. नरेंद्र सोनी यांनी आभार मानले.